सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १६ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## केंद्र सरकारकडून जनगणनेची अधिसूचना जारी

## ३५ लाखांहून अधिक कर्मचारी काम करणार, ॲपचा वापर होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

देशात गेल्या काही महिन्यांपासून जात जनगणना आणि जनगणनेची चर्चा सुरू आहे. यासाठी राजपत्रित अधिसूचना जारी करण्यात आली आहे. लोकसंख्येची जनगणना २०२७ या वर्षात केली जाणार आहे. तत्पूर्वी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी जनगणनेच्या तयारीचा आढावा घेतला. त्यांनी केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन, महापंजीयन आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण आणि इतर अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. सरकारी निवेदनानुसार, ही जनगणना पूर्णपणे डिजिटल असणार आहे. यासाठी मोबाईल ॲप्स तयार केले



जातील आणि त्यामध्ये जनगणनेशी संबंधित सर्व माहिती गोळा केली जाईल. हे ॲप्स १६ भाषांमध्ये उपलब्ध असणार आहेत.

याबाबत केंद्रीय गृहमंत्री यांनी सोशल मिडिया पोस्ट शेअर केली. यामध्ये म्हटले की, '१६ व्या जनगणनेत पहिल्यांदाच जातगणनेचा समावेश असेल. ३४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक, १.३ लाख जनगणना अधिकारी आधुनिक मोबाईल आणि डिजिटल उपकरणांसह हे काम करतील. जम्मू-काश्मीर आणि लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या केंद्रशासित प्रदेशांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ पासून आणि देशातील उर्वरित भागात १ मार्च २०२७ पासून जातीगणना आणि जनगणनेचे काम सुरू होईल.

**जनगणना दोन टप्प्यात होणार**

जनगणना दोन टप्प्यात केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात म्हणजेच घरांची यादी आणि गृहनिर्माण गणना , प्रत्येक कुटुंबाची निवासी स्थिती, मालमत्ता आणि सुविधांची माहिती गोळा केली जाईल. त्यानंतर, दुसऱ्या टप्प्यात (लोकसंख्या गणना), प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर माहिती गोळा केली जाणार आहे.

**स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना**

ही जनगणना भारताची १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असेल. यावेळी जनगणना मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. नागरिकांसाठी स्व-गणना सुविधा देखील उपलब्ध असेल. डेटा सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी संकलन, प्रसारण आणि साठवणूक करताना कडक सुरक्षा उपाययोजना केल्या जातील. शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती आणि ही जनगणना १६ वर्षांच्या अंतरानंतर केली जाणा आहे.

## भारतावर पुन्हा युक्रेनसारखी परिस्थिती!

## १५०० विद्यार्थी इराणमध्ये अडकले

### एअर इंडियालाच काहीतरी करावे लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नवी दिल्ली**

भारतावर तीन वर्षांनी पुन्हा युक्रेनसारखी परिस्थिती उद्भवली आहे. भारतातील हजारो विद्यार्थी युक्रेनमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी गेले होते. रशियाने हल्ले चढविल्यानंतर हे विद्यार्थी मिसाईलच्या छायेत अडकले होते. तेव्हा एअर इंडियाच या विद्यार्थ्यांसाठी धावून गेली होती. या विद्यार्थ्यांना पुन्हा मायदेशात आणण्यासाठी एअर इंडियाची विमाने अहोरात्र उड्डाणे करत होती. आताही भारतावर तीच परिस्थिती आली आहे, सुमारे दीड हजार भारतीय विद्यार्थी इराणमध्ये अडकले आहेत.

इराणमध्ये इंटरनेट बंद करण्यात आले आहे, यामुळे या विद्यार्थ्यांशी पालकांचा काहीच संपर्क होत नाहीय. तेहरान जळत आहे, इस्रायल एकावेळी २००-२०० विमाने घुसवून हल्ले करत आहे. १०-१५ वेळा प्रयत्न केला तर कुठे जाऊन १ फोन लागत आहे, आमची मुले तिथे सुरक्षित नाहीत. सरकारने त्यांना बाहेर काढावे, असे आवाहन पालकांनी केले आहे. याचबरोबर इराक आणि पाकिस्तानने त्यांची मुले इराणमधून बाहेर काढली आहेत, असेही त्यांचे म्हणणे आहे.

बहुतांश विद्यार्थी हे काश्मीरचे आहेत. इराण



आणि काश्मीर यांचा जवळचा संबंध आहे. शिया बहुल मुस्लिम आणि इराण यांचा ऐतिहासिक संबंध असल्याने जेव्हा जेव्हा इराणवर हल्ला होतो तेव्हा काश्मीर घाटीत, कारगिलमध्ये हे मुस्लिम नागरिक आंदोलने करतात. यावेळीही केली आहेत. यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर सुरक्षा यंत्रणांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. इस्रायलने १५ जूनला दुपारी हजत दोस्त अली हॉस्टेलवर हल्ला केला आहे. यात काही काश्मीरी विद्यार्थी जखमी झाले आहेत. या युद्धात १५०० भारतीय विद्यार्थी अडकले असल्याचे काश्मीरच्या रेहाना अख्तर हिने म्हटले आहे.

## ...हा तर माझा गेम करण्याचा भाजपचा डाव

## बच्चू कडूंचा पलटवार; म्हणाले कारवाई सूडबुद्धीतून



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर आणि दिव्यांगांच्या प्रश्नांवर गेल्या आठवड्यात बेमुदत अन्नत्याग सत्याग्रह केला. सात दिवसांनंतर त्यांनी हे आंदोलन स्थगित केले, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदावरून अपात्र ठरविण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील राजकारण तापण्याची चिन्हे आहेत. बच्चू कडू यांना घेरण्यासाठी विरोधक वेगवेगळ्या प्रकारचे डावपेच खेळत आहे. त्यावर बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

बच्चू कडू म्हणाले, आपल्याला जिल्हा बँकेच्या संचालक पदावरून अपात्र ठरविण्यात आले, हे आपल्याला सर्वप्रथम माध्यमांकडूनच कळले. मला अपात्र ठरवले जाते आणि त्याची साधी नोटीसही आपल्याला दिली जात नाही, याचे आश्चर्य वाटते. आपल्यावरील ही कारवाई सूडबुद्धीतून करण्यात आली आहे. काँग्रेसच्या काही संचालकांनी आपल्याला अपात्र ठरविण्याची मागणी केली होती. त्यांचा वापर करून भाजपने ही कारवाई करण्यास भाग पाडले आहे. ही संविधानाची पायमल्ली आहे.

कारवाईची माहिती माध्यमांना दिली जाते, मला ते माध्यमांमधून कळते. नाशिक न्यायालयाच्या निर्णयाला आपण उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाच्या आदेशाची ही अवमानना आहे का, हे तपासले जाईल. लवकरच आपण याविषयी विस्तृत माहिती जनतेसमोर मांडून पण, ही काँग्रेस आणि भाजपने मिळून केलेली ही कारवाई दिसत आहे.बच्चू कडू म्हणाले, आपण सरकारच्या विरोधात बोलू नका, अन्यथा आपल्याला कुठेतरी अडकविण्याचा प्रयत्न केला जाईल, येत्या काही महिन्यात बच्चू कडूला संपवायचे, असे विरोधकांनी ठरविल्याची माहिती आपल्याला एका अधिकाऱ्याने दिली होती. ही एक प्रकारे धमकीच होती. हे आपल्याला अपेक्षितच होते. आपला आवाज दडपण्याचा प्रयत्न होत आहे, पण आपण आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहोत, असे बच्चू कडू यांनी सांगितले. विभागीय सहनिबंधकांच्या या आदेशाच्या विरोधात न्यायालयात दाद मागितली जाईल, असे ते म्हणाले.

### राजकीय संबंध नाही

बच्चू कडू यांना जिल्हा बँकेच्या संचालकपदावरून अपात्र



ठरविण्याचा हा जिल्हा विभागीय सहनिबंधकांनी घेतला आहे. त्याचा भाजपशी काहीही संबंध नाही. काँग्रेसच्या संचालकांनी त्यांच्या विरोधात याचिका दाखल केली होती. हे जुने प्रकरण आहे. त्याचा बच्चू कडू यांनी केलेल्या उपोषणाशीही संबंध नाही, असे अचलपूरचे भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांनी सांगितले.

## प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना मोठा दणका

### अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदावरून बच्चू कडू अपात्र : विभागीय सहनिबंधक यांचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर आणि दिव्यांगांच्या प्रश्नांवर गेल्या आठवड्यात बेमुदत अन्नत्याग सत्याग्रह केला. सात दिवसांनंतर त्यांनी हे आंदोलन स्थगित केले, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांचे अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सदस्यत्व अपात्र ठरविण्यात आले आहे.

बच्चू कडू हे जिल्हा बँकेचे विद्यमान संचालक तथा अध्यक्ष आहेत. विभागीय सहनिबंधकांनी त्यांचे संचालक पद अपात्र ठरविले आहे. त्यामुळे ते अध्यक्षपदावरूनही अपात्र झाले आहेत. बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांच्यासह ११ संचालकांनी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र



करण्याबाबतची याचिका दाखल केली होती. नाशिक न्यायालयाने बच्चू कडू यांना एका प्रकरणात एका वर्षाची शिक्षा सुनावली असल्याचा दाखला त्यांनी यामध्ये दिला होता.

याचा आधार घेत विभागीय सहनिबंधक यांनी आपणास अपात्र का करण्यात येऊ नये, तसेच पुढील पाच वर्षाकरीता आपणास सदरचे पद धारण करण्यास अपात्र का करू नये? अशी नोटीस बच्चू कडू यांना गेल्या फेब्रुवारी महिन्यात बजावण्यात आली होती. २०१७ मध्ये नाशिकच्या सरकारवाडी पोलीस ठाण्यात बच्चू कडू यांच्यावर शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी आणि मारहाण केल्या प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. नाशिकच्या विशेष न्यायालयाने २०२१ मध्ये बच्चू कडू यांना एक वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेला बच्चू कडूंनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले असून हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार बँकेचा सदस्य कुठल्याही गुन्ह्यासाठी एक वर्षापेक्षा कमी नाही, इतक्या कालावधीच्या कारावासासाठी सिद्ध अपराधी ठरला असेल, तर तो सदस्यपदावर राहण्यास पात्र राहणार नाही, अशी तरतूद असल्याने त्याआधारे बच्चू कडू यांना अपात्र ठरवले जावे, अशी मागणी करण्यात आली होती. हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात गेले. तिथून पुढे सर्वोच्च न्यायालयात पोहचले. सर्वोच्च न्यायालयाने अविश्वास ठरावाला स्थगिती दिली होती. या प्रकरणी विभागीय उपनिबंधकांकडे सुनावणी सुरू होती. या दरम्यान विभागीय उपनिबंधकांनी आज बच्चू कडू यांना संचालकपदावरून अपात्र घोषित केले आहे. आदेशाच्या दिनांकापासून संचालक मंडळाचा कालावधी समाप्त होईपर्यंत समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक केली जाण्यास. पुन्हा नामनिर्दिष्ट होण्यास किंवा पुन्हा निवडून येण्यास पात्र असणार नाही, असे आदेशात म्हटले आहे.

## राज्यातील विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला

## हजारो स्कूल बसची योग्यता तपासणी थांबली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नागपूर**

राज्यातील प्रत्येक स्कूल बसच्या वेग नियंत्रण प्रणालीला १६ अंकी युनायटेड आयडेंटिफिकेशन क्रमांक (यूएनआय) बंधनकारक करण्यात आला आहे. त्यामुळे नवीन प्रणालीसाठी १० हजारांचा खर्च येणार आहे. हा खर्च करायला कुणी तयार नसल्याने राज्यातील हजारो स्कूल बसची योग्यता तपासणी थांबली आहे. त्यामुळे विना योग्यता तपासणी असलेल्या एखाद अनफिट स्कूलबसचा अपघात झाल्यास जबाबदार कोण? हा प्रश्न अनुत्तीर्ण आहे.



राज्यात ३१ मार्च २०२४ दरम्यान ३६ हजार ५५८ स्कूलबसची नोंदणी झाली होती. करार व कंत्राटी पद्धतीनेही राज्यात मोठ्या संख्येने स्कूलबस, स्कूल व्हॅन धावत आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी या वाहनांना पूर्वी वेग नियंत्रण प्रणाली आवश्यक करण्यात आली होती. या वाहनात ८ ते १२ यूएनआय क्रमांक होता. प्रत्येक बसचालकाला योग्यता तपासणीसाठी प्रत्येक वर्षी वाहन कंपनीकडून वेग नियंत्रण प्रणालीचे प्रमाणपत्र आरटीओत सादर करावे लागत होते. यानंतरच योग्यता प्रमाणपत्र मिळत होते.

आता शासनाने सर्व वाहनांच्या वेग नियंत्रण प्रणालीला १६ अंकी यूएनआय क्रमांक बंधनकारक केला आहे. त्यामुळे १० हजारांचा खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे वाहनचालक संतापले आहे. या घोळात राज्यातील हजारो स्कूलबस, व्हॅनची योग्यता तपासणी रखडली आहे. हा प्रश्न सोडवल्या जात नसल्याने शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास योग्यता प्रमाणपत्र नसलेल्या बस मध्ये होण्याचा धोका आहे. तर प्रामाणिक बस चालक वाहन सुस्थितीत असतांनाही नवीन आयडी घोळात योग्यता तपासणी करू शकत नसल्याचे चित्र आहे.

**स्कूलबस संघटनेचे म्हणणे काय ?**

योग्यता तपासणीसाठी ऑनलाईन प्रक्रिया करत असताना जुना वेग नियंत्रण क्रमांक वैध नसल्याचे व १६ डिजिट हवा असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे वाहनांची योग्यता तपासणी होत नाही.

## माझ्यावर अन्याय झाला; सुवर्णपदकप्राप्त महिला आरएफओची वनमंत्र्यांकडे धाव

## नियमबाह्य व बेकायदेशीर निलंबन आदेशावर अपील करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

वने आणि वन्यजीव संवर्धनात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या धुळे-नवापूर येथील वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) स्नेहल अवसरमल यांचे नियमबाह्य व बेकायदेशीर निलंबन झाल्याप्रकरणी त्यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे निलंबन आदेशावर अपील करण्याची मागणी केली आहे. हे निलंबन महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशाविरोधात असल्यामुळे आरएफओ अवसरमल यांचे म्हणणे असून, त्यांनी न्यायासाठी वनमंत्र्यांकडे धाव घेतली आहे.

महिला आरएफओ स्नेहल अवसरमल यांना मुंबई येथे जागतिक वनदिनानिमित्त २१ मार्च २०२५ रोजी वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले होते. मात्र कामात अनियमितता, अपहार झाल्याचा ठपका ठेवत निलंबन करण्यात आले आहे. तक्रारदार लेखापाल हे दोन वर्षापूर्वीच सेवानिवृत्त झाले असून, वरिष्ठांनी कामांची घटनास्थळी पाहणी केली आहे. वस्तुनिष्ठ अहवालदेखील सादर करण्यात आला होता. यंदा प्रशासकीय बदलीस पात्र असाना मुद्दामहून ३१ मे २०२५ रोजी निलंबनाने आदेश निर्गमित करण्यात आले, असे आरएफओ



स्नेहल अवसरमल यांनी वनमंत्री नाईक यांना ३१ मे रोजी पाठविलेल्या विनंती पत्रात नमूद केले आहे. झालेले बेकायदेशीर निलंबन आदेश आणि तक्रारीच्या अनुषंगाने वास्तव जाणून घेत याविषयी अपील घेऊन न्याय प्रदान करावा, अशी मागणी महिला आरएफओ अवसरमल यांनी वनमंत्र्यांकडे केली आहे.

आरएफओ अवसरमल यांच्यावर नवापूर प्रादेशिकमध्ये २६ लाख ६१ हजार २३० रुपये, तर रोहयोत १८ लाख ४६ हजार ९२ रुपये असे एकूण मिळून ४५ लाख १७ हजार ३२२ रुपयांची अनियमितता केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. दरम्यान, धुळे येथील वनसंरक्षक (प्रादेशिक) निनू सोमराज यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

**'मॅट'चे आदेश पायदळी तुडविले**

वनक्षेत्रपाल हे पद राजपत्रित संवर्गातील वर्ग २ चे पद आहे. या पदाचे नियुक्त अधिकारी हेच शिस्तभंगविषयक प्राधिकृत अधिकारी आहेत. असे असताना धुळे येथील वनसंरक्षक (प्रादेशिक) निनू सोमराज यांनी आरएफओ स्नेहल अवसरमल यांना शासकीय कर्तव्यात हलगर्जीपणा, निष्काळजीपणा आणि वित्तीय अनियमितता केल्याप्रकरणी ३० मे रोजी निलंबनाचे आदेश निर्गमित केले. ही बाब महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण मुंबई (मॅट) यांच्या आदेशाविरोधात आहे. आरएफओच्या निलंबनाचे आदेश वनसंरक्षकांना काढण्याचे अधिकार नाहीत, असे आरएफओ अवसरमल यांनी वनमंत्री नाईक यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

## संपादकीय ......

# उघडले शाळेचे दार...!

उन्हाळी सुट्टी संपून नवीन शैक्षणिक वर्षासाठी शाळांचे दरवाजे पुन्हा उघडले आहेत. अचानक आलेल्या मान्सूनमुळे उन्हाळा यावर्षी कमी काळच राहिला. 'शाळा सुटली, पाटी फुटली' असे म्हणत सैराट वेगाने घराकडे जाणारे विद्यार्थी आपण नेहमी पाहत असतो. शाळेमध्ये येताना जीवावर आल्यासारखे रखडत रखडत विद्यार्थी येत असतात. शाळेत येताना त्यांना उत्साह वाटावा म्हणून बहुतांश शाळांमध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत केले जाते. अतिशय स्तुत्य असा हा उपक्रम आहे. विद्यार्थी पहिल्या दिवशी उत्साहात येतील आणि हा उत्साह शेवटपर्यंत टिकेल, अशी आपण आशा बाळगूयात.

शाळेला जाणे सर्वात जास्त जीवावर कुणाच्या येत असेल, तर ते लहान वयोगटातील मुलांच्या. सीनिअर केजी किंवा बालवाडी संपवून इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश करणारे विद्यार्थी सुट्टीच्या काळात शाळा सुरू होणार म्हणून अत्यंत उत्साहात असतात; पण जसजशी शाळा जवळ येते तसतसे त्याचे रडणे, अंग टाकणे, नखरे करणे सुरू होते. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये कोणाचेही नियंत्रण नसताना खूप खेळला, बागडलेला हा इयत्ता पहिलीचा विद्यार्थी शाळेच्या बंधनात अडकवून घेण्यास तयार नसतो. रडत भेकत जाणारी छोटी मुले आणि त्यांना टराटरा ओढत नेणारी त्यांची आई हे दृश्य पहिल्या दिवशी नेहमीचेच आहे. आपण सर्वजण या अवस्थेमधून गेलेलो असतो.मंडळी, सुट्टीच्या काळात घरातील मुलांच्या गोंधळामुळे आणि पसारा करून ठेवायच्या प्रवृत्तीमुळे त्यांचे आई, बाप कधी एकदा शाळा सुरू होते, या प्रतीक्षेत असतात. एकदाचे त्याला शाळेत टाकले की, चार-सहा तास तरी निवांत असतात. कुटुंबीय आणि विशेषत: आई निवांत असते. तिला घरातील कामे करण्यास वेळ मिळतो.

सुरुवातीला शाळेत जाण्यास नकार देणारा शाळकरी मुलगा किंवा मुलगी पहिल्या दोन-तीन दिवसांत रुळतो आणि शाळेतील मित्र-मैत्रिणींबरोबर शाळेत जाण्यास उत्सुक असतो. शाळा हा प्रत्येक व्यक्तीच्या भावविश्वाचा न मिटणारा भाग आहे. तुम्ही आठवून पाहा. महाविद्यालयात तुम्हाला कोण शिक्षक शिकवायला होते, त्यांची नावे तुम्हाला आठवणार नाहीत; परंतु शाळेमध्ये तुम्हाला शिकवायला कोण होते, हे निश्चितच आठवेल. याच कारणामुळे शाळकरी मुलांचे पुढे उतारवयात असतानासुद्धा गेटटूगेदर होत असते. दहावी संपल्यानंतर प्रत्येक जण करिअरच्या दिशेने निघून जातो. प्रत्येकाची वाट वेगळी होते. वाटा वेगळ्या झाल्या असल्या आणि प्रत्यक्ष संपर्क नसला, तरीही शाळकरी मैत्री मनातून कधी जात नाही. सोशल मीडियामुळे गाठीभेटी सोप्या झाल्या आहेत. कधीकाळी शाळेत असलेले आणि आता पन्नाशी, साठी, पंच्याहत्तरीत असलेले वर्गमित्र एकत्र येतात आणि पुन्हा शाळेच्या जुन्या आठवणी जागवतात.

# वैभवीच्या मनोगताने सारेचं भावुक...

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ अमरावती**




मस्साजोग जि-बीड येथील सरपंच स्व. संतोषअण्णा देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हीची आज १५ जुन रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळ्यातील उपस्थिती सर्वांसाठीचं लक्षवेधी ठरली.सन्मान सोहळ्याचं आयोजन करणाऱ्या डॉ भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख समाजसेवी संस्था अमरावती यांच्या वतीनं वैभवीन हृदय पिळवटून टाकणाऱ्या वेदनेवरही मात करून मिळविलेल्या यशाबद्दल माजी मंत्री यशोमतीताई ठाकुर यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला.डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख बहुद्देशिय समाजसेवी संस्था अमरावती च्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव व कौतुक सोहळा आणि मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.मस्साजोग जि. बिड येथील दिवंगत सरपंच स्व .संतोषअण्णा देशमुख यांची कन्या कु. वैभवी देशमुख हिने इयत्ता बारावीत तसेच छएएढ परीक्षेत भरगोस यश प्राप्त केल्यामुळे तिचा विशेष सत्कार सोहळा देखील यावेळी पार पडलायाप्रसंगी वैभवीने आपल्या वडिलांची निर्घृण हत्या झाल्यानंतर कशी विदारक परिस्थिती निर्माण झाली. याविषयी अतिशय भावुक मनोगत व्यक्त करतांना कोणतही संकट तुम्हाला प्रगतीपासून रोखू शकत नाही हा लाखं मोलाचा संदेश उपस्थित विद्यार्थ्यांना देत गेल्या काही महिन्यातील अनुभव विषद करताना, वैभवी एक,एक अनुभव मांडत होती अन् तिच्या या दाहक अनुभवाने अख्या सभागृहात विलक्षण नीरव शांतता आणि अंगावर काटा आणणाऱ्या तिच्या एक,एक शब्दाने प्रत्येकजनाच्या नेत्रकडा ओलावल्या होत्या. एखाद्या भयंकर संकटातून होरपळून निघाल्यानंतर अगदी लहान वयातसुद्धा कोवळ मन किती प्रगल्भ होत याची अनुभूती देण्यासोबतच कोणत्याही क्षणी अश्रूंचे बांध फुटतील असा हा प्रसंग होता.वडिलांच्या निर्घृण हत्येनंतर सुद्धा वैभविने इयत्ता बारावीच्या परिक्षेतचं नव्हेतर नीट परीक्षेत सुद्धा यश संपादन केलं. याविषयी ती म्हणते मला माझ्या बाबांचं सप्न पुर्ण करायचय. त्यासाठी मी हा संघर्ष करते आहे. पण याचं वेळीं बाबा नाहीत यावर माझा विश्वास बसतं नाहीये. कारणं उपस्थित सर्व पालकांमध्ये मी पण माझेबाबाशोधतेय.या तीच्या एका वाक्यंन तीच्या हृद्यात अजुनही सुरू असलेली घालमेल, सैरभर मन अन् अंतर्मनातील ज्वालामुखी सारखा धगधगनारा प्रचंड आक्रोश उपस्थितांच हृदयाचा वेध घेणारा होता. वैभवीच्या मनोगताने सारेचं भावुक...मस्साजोग जि-बीड येथील सरपंच स्व. संतोषअण्णा देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हीची आज १५ जुन रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळ्यातील उपस्थिती सर्वांसाठीचं लक्षवेधी ठरली.सन्मान सोहळ्याचं आयोजन करणाऱ्या डॉ भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख समाजसेवी संस्था अमरावती यांच्या वतीनं वैभवीन हृदय पिळवटून टाकणाऱ्या वेदनेवरही मात करून मिळविलेल्या यशाबद्दल माजी मंत्री यशोमतीताई ठाकुर यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला.डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख बहुद्देशिय समाजसेवी संस्था अमरावती च्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव व कौतुक सोहळा आणि मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मस्साजोग जि. बिड येथील दिवंगत सरपंच स्व .संतोषअण्णा देशमुख यांची कन्या कु. वैभवी देशमुख हिने इयत्ता बारावीत तसेच छएएढ परीक्षेत भरगोस यश प्राप्त केल्यामुळे तिचा विशेष सत्कार सोहळा देखील यावेळी पार पडलायाप्रसंगी वैभवीने आपल्या वडिलांची निर्घृण हत्या झाल्यानंतर कशी विदारक परिस्थिती निर्माण झाली. याविषयी अतिशय भावुक मनोगत व्यक्त करतांना कोणतही संकट तुम्हाला प्रगतीपासून रोखू शकत नाही हा लाखं मोलाचा संदेश उपस्थित विद्यार्थ्यांना देत गेल्या काही महिन्यातील अनुभव विषद करताना, वैभवी एक,एक अनुभव मांडत होती अन् तिच्या या दाहक अनुभवाने अख्या सभागृहात विलक्षण नीरव शांतता आणि अंगावर काटा आणणाऱ्या तिच्या एक,एक शब्दाने प्रत्येकजनाच्या नेत्रकडा ओलावल्या होत्या. एखाद्या भयंकर संकटातून होरपळून निघाल्यानंतर अगदी लहान वयातसुद्धा कोवळ मन किती प्रगल्भ होत याची अनुभूती देण्यासोबतच कोणत्याही क्षणी अश्रूंचे बांध फुटतील असा हा प्रसंग होता.वडिलांच्या निर्घृण हत्येनंतर सुद्धा वैभविने इयत्ता बारावीच्या परिक्षेतचं नव्हेतर नीट परीक्षेत सुद्धा यश संपादन केलं. याविषयी ती म्हणते मला माझ्या बाबांचं सप्न पुर्ण करायचय. त्यासाठी मी हा संघर्ष करते आहे. पण याचं वेळीं बाबा नाहीत यावर माझा विश्वास बसतं नाहीये. कारणं उपस्थित सर्व पालकांमध्ये मी पण माझेबाबाशोधतेय.या तीच्या एका वाक्यंन तीच्या हृद्यात अजुनही सुरू असलेली घालमेल, सैरभर मन अन् अंतर्मनातील ज्वालामुखी सारखा धगधगनारा प्रचंड आक्रोश उपस्थितांच हृदयाचा वेध घेणारा होता.-




## रजोनिवृत्तीदरम्यान घ्या हृदयाची काळजी

दि.१६विदर्भ प्रजासत्ताक १२

रजोनिवृत्ती हा स्त्रीच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. रजोनिवृत्ती अर्थात मेनोपॉजदरम्यान आणि नंतर एलडीएल (खराब कोलेस्टेरॉल) वाढणे आणि एचडीएल (चांगले कोलेस्ट्रॉल) कमी होणे ही समस्या दिसून येते. यात हृदयविकाराचा धोका अधिक असतो, ज्यामध्ये कोरोनरी आर्टरी डिसीजसारख्या समस्यांचा समावेश होतो.

मेनोपॉज हा महिलांमध्ये होणारा नैसर्गिक बदल असून सर्वसामान्यपणे ४५ ते ५५ वयोगटात आढळून येतो. या स्थितीत महत्त्वाचे हार्मोनल बदल होतात. एस्ट्रोजनचा स्तर कमी होऊ लागतो. एस्ट्रोजन केवळ प्रजननाचीच भूमिका निभावत नाही, तर हृदयाचे आरोग्य हेल्दी राखण्याचेही काम करते. इस्ट्रोजेनची पातळी कमी होत असताना या संप्रेरकाचा हृदयावर होणारा संरक्षणात्मक प्रभाव कमी होतो, ज्यामुळे रजोनिवृत्तीनंतरच्या महिलांना हृदयाशी संबंधित समस्यांना अधिक धोका निर्माण होतो.

लक्षणे

अचानकच छातीत, चेहर्यावर किंवा मानेच्या भागात गरम झळा आल्यासारखं वाटणं.

रात्रीच्या वेळी खूप घाम येणे.


सतत मूड बदलणे.

झोपेसंबंधी तक्रारी.

योनीचा कोरडेपणा.

अनियमित किंवा चुकलेली मासिक पाळी.

वरील लक्षणे सर्वज्ञात असली, तरी रजोनिवृत्तीमुळे ऑस्टियोपोरोसिस आणि



हृदयरोगासह दीर्घकालीन आरोग्य समस्यादेखील उद्भवू शकतात.

रजोनिवृत्ती आणि हृदयरोगाचा परस्पर संबंध

रजोनिवृत्तीमुळे काही महिलांमध्ये हृदयरोगदेखील होऊ शकतो.निरोगी रक्तवाहिन्या राखण्यात आणि कोलेस्ट्रॉलची पातळी व्यवस्थापित करण्यात इस्ट्रोजेन महत्त्वाची भूमिका बजावते. रजोनिवृत्तीचा काळात महिलांनी दर ६ महिन्यांनी किंवा वर्षातून एकदा हृदयरोग तपासणी वेळेवर करून घ्यावी आणि वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. ज्या महिलांना आधीच हृदयरोग आहे आणि ज्यांना रजोनिवृत्तीचा धोका आहे त्यांनी अधिक सतर्क राहावे. या काळात महिलांनी त्यांच्या हृदयाची विशेष काळजी घ्यावी आणि निरोगी जीवनशैली बाळगावी.

हृदयाचे रक्षण करण्यासाठी टिप्स

:

संतुलित आहाराचे सेवन : तृणधान्य, फळे, भाज्या, प्रथिने आणि हेल्दी फॅट्सचा आहारात समावेश करावा. मीठ आणि प्रक्रिया केलेले अन्न पदार्थांचे सेवन मर्यादित करावे. जंक फूड, तेलकट, हवाबंद डब्यातील पदार्थ आणि प्रक्रिया केलेल्या अन्नाचे सेवन टाळावे. शरीर हायड्रेटेड राखणे आणि तज्ञांच्या सल्ल्यानुसार पूरक आहाराचे सेवन करणे आवश्यक आहे.

सक्रिय जीवनशैली बाळगा : आठवड्यातून पाच दिवस किमान ३० मिनिटे मध्यम तीव्रतेचे व्यायाम करा. धावणे, जिमला जाणे, योगा, पिलेट्स्, पोहणे आणि सायकलिंग अशा पर्यायांची निवड करा.

रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलच्या पातळीचे निरीक्षण करा. नियमित तपासणीमुळे वेळीच मदत होऊ शकते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचाराचे सेवन करा.

वजन नियंत्रित राखा : लठ्ठपणामुळे हृदयरोगाचा धोका वाढतो. म्हणून वजन नियंत्रित राखावे.

धूम्रपान टाळा आणि अल्कोहोल मर्यादित करा. कारण, या सवयी हृदयावर ताण आणू शकतात.

तणावाचे व्यवस्थापन : तणाव कमी करण्यासाठी आणि शांत राहण्यासाठी योग, ध्यान किंवा दीर्घ श्वास घेण्यासारख्या विश्रांती तंत्रांचा सराव करावा.

# सर्वाधिक उत्पादन देणारे मूग आणि उडीदाचे बेस्ट वाण, वाचा सविस्तर

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

कृषी विशेष

आपल्याकडे खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात (घहरीळष डशर-ीप) कडधान्य पिके घेतली जातात. खरीप हंगामात तूर, मूग, उडीद, कुळीद, मटकी, राजमा, वाटाणा व चवळी ही पीके घेतली जातात. महाराष्ट्र हे कडधान्य उत्पादनातील एक अग्रगण्य राज्य आहे. या मध्ये तूर, मूग व उडीद ही महत्वाची पिके आहेत. आजच्या भागातून मूग आणि उडीद लागवडीसाठी (णवळव डरसींव) कुठले वाण आहेत, हे समजून घेऊया....

**महात्मा फुले कृषी विद्यापीठाने प्रसारित केलेले**

**मुगाचे वाण : फुले चेतक आणि फुले सुवर्ण**

उडीदाचे वाण : फुले वसू आणि फुले राजन

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने प्रसारित केलेले

**मुगाचे वाण :** पी के व्ही ए के एम ०४, पीकेव्ही ग्रीन गोल्ड

**उडदाचे वाण :** पीडीकेव्ही ब्लॅक गोल्ड, टी यु - १

डॉ. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने प्रसारित केलेले

**मुगाचे वाण : बी एम २००३**

- **२**तसेच इतर विद्यापीठाने प्रसारित केलेले




**मुगाचे वाण : उत्कर्ष पीएमडी - १०**उडदाचे वाण नर्मदा (आयपीव्ही - १९ - १०)

तुम्ही तुमच्या स्थानिक कृषी विद्यापीठाशी किंवा कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तुमच्या परिसरासाठी आणि परिस्थितीसाठी योग्य वाणाची निवड करू शकता.

- डॉ. सुरेश दोडके, डॉ. अरविंद तोत्रे, डॉ. अमोल लांघी, कडधान्य सुधार प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु फूडस्
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# पोलिसांना खबर दिल्याच्या संशयावरून युवकावर प्राणघातक हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती-** एमडी ड्रग्ज आणल्याची खबर पोलिसांना दिल्याच्या संशयावरून युवकावर लोखंडी पाईपने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना शुक्रवारी रात्री नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. याघटनेत पोलिसांनी जखमी शहेजाद खान गौस खान (वय ३०, रा. अलीमनगर) याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. शेख मुदस्सीर शेख (वय ५५), शेख मुजम्मील शेख अहमद (वय २८), मोहम्मद मुदस्सीर शेख अहमद (वय २५), शेख अजहर शेख अहेमद आणि शेख पापा (वय ६०, सर्व रा. अलीमनगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.शेख मुदस्सीर याचा एक मित्र बडनेऱ्यात राहतो आणि एमडी ड्रग्ज विकतो.याबाबत जखमी शहेजाद खानला माहिती आहे. दरम्यान काही महिन्याआधी पथकाने बडनेरा ठाण्याच्या हद्दीत २०० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करून तीन आरोपींना अटक केली होती. त्यामुळे पोलिसांना ही माहिती कोणी दिली यावरून एमडी ड्रग्ज तस्करात काही दिवसांपासून चांगलीच कुजबूज सुरु आहे. शहेजाद खाननेच पोलिसांना खबर दिल्याचा संशय आरोपींना होता. त्यामुळे त्यांनी शहेजाची माहिती काढली आणि त्याचे खात्यात कोणासोबत संबंध आहे, याबाबत माहिती घेतली आणि संशयावरून शुक्रवारी रात्री त्याच्यावर लोखंडी पाईपने सर्वांनी हल्ला चढविला.

# भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके (आयपीएचएस) अंतर्गतवैद्यकीय तज्ञांचे १० महिन्यांपासून वेतन प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६वरुड-** वरुड-गेल्या अनेक वर्षापासून वरुडच्या ग्रामीण रुग्णालयाला शासनासह अनेक खाजगी पुरस्कार प्राप्त झाले आहेत, एवढेच नव्हेतर वरुडच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्ण आणि त्यांच्या नातेवाई कांना मिळत असलेल्या सोईसुविधांमुळे या ठिकाणी रुग्णांची संख्या सुध्दा सातत्याने वाढतीवरच आहे, अशा स्थितीत याठिकाणी सेवा देणाऱ्या विविध तज्ञ आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांना गेल्या १० महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे शासनाच्या या दर्लक्षामुळे आता रुग्णांना मिळणाऱ्या सेवा खंडीत होणार नाही ना? असा प्रश्न निर्माण झाला आहे.वरुडचे ग्रामीण रुग्णालय केवळ जिल्ह्यातच नव्हे तर संपुर्ण सुपरिचीत आहे. या ग्रामीण रुग्णालयाला या ठिकाणी रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सोईसुविधांमुळे महाराष्ट्र शासनाचे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. वरुड शहरातील अनेक डॉक्टर मंडळी याठिकाणी आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून गरजु आणि गरीब रुग्णांकरीता सेवा सुध्दा देत असतात. अशा स्थितीत या रुग्णालयात भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके (आयपीएचएस) अंतर्गत या अनेक वैद्यकीय तज्ञ सेवा देत असतात. त्यामध्ये स्त्रि रोग तज्ञ, बालरोगतज्ञ, बधिरिकरणतज्ञ, क्ष-किरण तज्ञ, कान-नाक-घसा तज्ञ या सहविविध प्रकारचे डॉक्टर मंडळी या ठिकाणी मानधन तत्वावर कार्यरत आहेत. ज्या डॉक्टरांच्या सेवेमुळे वरुड तालुक्यातसह आजुबाजुच्या तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांना या ठिकाणी वैद्यकीय सेवा मिळत आहे, त्याच डॉक्टरांना गेल्या १० महिन्यांपासुन शासनाने वेतन मिळालेले नाही. जुलै २०२४ पासुन या सर्व वैद्यकीयतज्ञांचे १० ते ११ महिन्याचे वेतन थकीत आहे. याबाबत काही वैद्यकीय तज्ञांनी तोंडी विचारले असता ग्रँट नाही, असे उत्तर आयपीएचएस कार्यालयातून सांगण्यात आले. वास्तवित महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील आयपीएचएस डॉक्टरांचे शेवटचे २ महिने व्यतिरिक्त संपुर्ण वेतन झाल्याचे कळते.वरुडच्या ग्रामीण रुग्णालयात मोठ्या प्रमाणात नॉर्मल डिलिव्हरी होतात आणि त्याचप्रमाणात सिझरियन सुध्दा होता, त्यामुळे जोपर्यंत या रुग्णालयामध्ये वैद्यकीय तज्ञ उपलब्ध होत नाही तोपर्यंत रुग्ण आणि त्यांचे नातवाईकांना सेवा देणे अशक्य आहे. त्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचवुन वेळ आणि पैशाची सुध्दा बचत करणारे हे वैद्यकीय तज्ञ प्रलंबित वेतनामुळे त्रस्त असून भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके (आयपीएचएस) अंतर्गत तातडीने वेतन देण्याची मागणी होत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १६ जून २०२५

शहर/ग्रामीण


# देवदर्शनाआधीच काळाचा घाला

## हेलिकॉप्टर दुर्घटनेत यवतमाळमधील तिघांचा मृत्यू






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ यवतमाळ–** अहमदाबादमधील विमान अपघात ताजा असतानाच केदारनाथ धाममध्ये हेलिकॉप्टर क्रॅश झाले आहे. या दुर्घटनेत पायलटसह सात जणांचा मृत्यू झाला आहे. आज पहाटे केदारनाथ धामला जात असताना गौरीगुंड आणि त्रिजुगीनारायण यादरम्यान हेलिकॉप्टर क्रॅश झाले. या दुर्दैवी घटनेत महाराष्ट्रातील तीन जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये दोन वर्षाच्या काशीचाही समावेश आहे. दुर्घटनाग्रस्त हेलिकॉप्टर आर्यन कंपनीचे होते. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर कोसळल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. हेलिकॉप्टर नोडल अधिकारी राहुल चौबे यांनी हेलिकॉप्टर अपघाताची पुष्टी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केदारनाथ धाम येथे झालेल्या हेलिकॉप्टर दुर्घटनेत यवतमाळमधील वणी येथील जयस्वाल कुटुंबाचा मृत्यू झाला. राजकुमार जयस्वाल, श्रद्धा जयस्वाल, काशी राजकुमार जयस्वाल अशी तिन्ही मृतांची नावे आहेत. १२ जून रोजी राजकुमार जयस्वार हे पत्नी श्रद्धा आणि मुलगी काशीसोबत वणी इथून केदारनाथसाठी गेले होते. पण देवदर्शन करण्यापूर्वीच त्यांच्यावर काळाने घाला घातला.या घटनेने संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# घरकुलाच्या यादीत चुकून दूसरे नाव आल्याने राडा

## ग्रामविकास अधिकाऱ्याला कार्यालयातच बदडले

### खाझार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना , आरोपी विरोधात गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती**,एका युवकाला त्याच्या फाईल क्रमांकानुसार घरकुल मंजूर झाले, परंतु, क्रमांकासमोर दुसऱ्याच लाभार्थ्यांचे नाव आल्याने व्यक्तीने ग्राम पंचायत कार्यालयातच ग्राम विकास अधिकाऱ्याला बदडल्याने चांगलीच खळबळ उडाली. दर्यापुर तालुक्यातील खल्लार पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या नाचोना गावात ही घटना घडली. योगेश नारायण अरबट (३५) रा.नाचोना असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. तर तक्रारकर्त्या ग्राम विकास अधिकाऱ्याचे नाव आशिष जोजेकराव गवई (३५) रा. साईनगर, दर्यापुर असे आहे.

माहितीनुसार, तक्रारकर्ते आशिश जोजेकराव गवई हे नाचोना ग्राम पंचायतमध्ये ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांच्याकडे घरकुलाच्या यादीचे काम आहे.



आरोपी योगेश अरबट यांनी घरकुलासाठी अर्ज केला होता. त्यांना घरकुल प्राप्त झाल्याचा मॅसेज देखील आला. त्यानुसार योगेश हे आशिष गवई यांच्याकडे केले. परंतु, यादीमध्ये अर्ज क्रमांकासमोर योगेश नारायण अरबट ऐवजी अमोल केशव अरबट असे नाव आल्याने योगेशने याबाबत आशिष गवई यांना जाब विचाला. तेव्हा नाव चुकल्याची कबुली देऊन आशिष गवई यांनी योगेशला दुसरी फाईल तयार करण्याचे सांगितले. त्यावर योगेशने तुम्हीच नाव चुकविले तुम्हीच फाईल तयार करा, असे म्हणून योगेशने वाद घातला आणि आशिष गवई यांना कार्यालयातच मारहाण केली. ही घटना घडताच चांगलीच खळबळ उडाली. लोकांनी योगेशला पकडल्यानंतर आशिष गवई यांनीयांनी तात्काळ खल्लार पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी योगेश अरबट विरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# चमक, सुरवाडा शिवारात नुकसानग्रस्त भागाची आ. तायडेंनी केली पाहणी

### पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे दिले निर्देश

विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ अचलपुर– अचलपूर तालुक्यात वादळी पावसाने झालेल्या चमक सुरवाडा परिसरातील नुकसानग्रस्त भागात आमदार प्रवीण तायडे यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे दिले निर्देश त्यांनी दिले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आश्वस्त केले.तालुक्यातील चमक, सुरवाडा परिसरात चक्रीवादळाने केळी, संत्रा आणि उन्हाळी ज्वारी पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. चमक सुरवाडा शेत शिवारात अचानकच दुपारच्या वेळेस चक्रीवादळाने फेर धरून घड असलेली उभी केळी, संत्राची संत्रा फळ असलेली उभी झाडे, उन्हाळी ज्वारी आणि रस्त्याच्या बाजूला असलेली मोठी झाडे क्षणात जमिनीवर कोसळून मातीमोल झाली. शेतकरी किसनराव प्रल्हादराव सोळंके यांच्या अडीच एकरातील ३५ ते ४० किलो



घडाच्या उभ्या केळी पिकाचे पाचशे झाडांचे अंदाजे चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

# अचलपूर तालुक्यातील वासणी बु. येथील शेतकऱ्याची आत्महत्या

### सततच्या नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून उचलले टोकाचे पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ वासणी बु.–** अचलपुर अचलपूर तालुक्यातील वासणी बु. येथे एका कर्जबाजारी शेतकऱ्याने सततच्या नापिकीला कंटाळून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. ही घटना दि. ९ जून २०२५ रोजी घडली असून, मृतक शेतकऱ्याचे नाव राम उर्फ संजय गजानन ठाकरे असे आहे. या घटनेने संपूर्ण गावात आणि परिसरात शोककळा पसरली आहे.

राम उर्फ संजय गजानन ठाकरे हे वासणी बु. गावातील रहिवासी होते. शेती हाच त्यांच्या कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय होता. मात्र, गेल्या काही वर्षांपासून सततच्या दुष्काळामुळे आणि अपुऱ्या पावसामुळे त्यांच्या शेतीला मोठा फटका बसला होता. यामुळे शेतातून अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. परिणामी, शेतीसाठी घेतलेले कर्ज आणि त्यावरील व्याजाचा बोजा वाढत गेला. या आर्थिक संकटामुळे आणि सततच्या नापिकीला कंटाळून राम यांनी टोकाचे पाऊल उचलले. दि. ९ जून रोजी त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली.राम उर्फ संजय ठाकरे यांच्या पश्चात त्यांची वृद्ध आई, पत्नी आणि दोन मुले असा आप्त परिवार आहे. या घटनेमुळे कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला आहे. विशेषतः, वृद्ध आई आणि लहान मुलांना आधार देण्याची जबाबदारी आता त्यांच्या पत्नीवर पडली आहे. कर्जाचा बोजा आणि शेतीतील नापिकी यामुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक झाली आहे.या घटनेने वासणी बु. गावात आणि परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटना या भागात नव्या नाहीत, परंतु प्रत्येक घटनेमुळे शेतकरी समाजातील आर्थिक आणि सामाजिक समस्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर येत आहे.अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुका हा शेतीप्रधान भाग आहे. मात्र, अपुरा पाऊस, कर्जबाजारीपणा, आणि शेतीमालाला मिळणारा कमी भाव यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. गेल्या काही वर्षांत या भागात शेतकरी आत्महत्येच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. राम उर्फ संजय ठाकरे यांच्या आत्महत्येने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या समस्यांकडे प्रशासनाचे आणि समाजाचे लक्ष वेधले आहे.शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या वाढत्या घटना हा सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांचा गंभीर परिणाम आहे. शेतीसाठी कर्जमाफी, शेतमालाला योग्य भाव, आणि पाणीपुरवठ्यासाठी प्रभावी उपाययोजना यासारख्या पावलांद्वारे शेतकऱ्यांना आधार देण्याची गरज आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी समुपदेशन आणि आधार यंत्रणेची निर्मिती करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.राम उर्फ संजय गजानन ठाकरे यांच्या आत्महत्येने वासणी बु. गावात शोककळा पसरली आहे. ही घटना केवळ एका कुटुंबाची नाही, तर संपूर्ण शेतकरी समाजाच्या व्यथा मांडणारी आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासकीय आणि सामाजिक पातळीवर ठोस पावले उचलण्याची गरज आहे, जेणेकरून अशा हृदयद्रावक घटनांना आळा बसू शकेल.

# विभागाने द्वारपोच चिकित्सा सेवा द्यावी – मंत्री पंकजा मुंडे

## गोशाळा नोंदणीचे प्रमाणपत्र वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती**

शासनाच्या प्रयत्नाने शेतकऱ्यांचा पशू पालनाकडे कल वाढत आहे. पशूसंवर्धन विभागाने या पशूंच्या आरोग्याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासल्यास विभागाने पशूंच्या चिकित्सेसाठी द्वारपोच सेवा द्यावी, असे निर्देश पशूसंवर्धन व पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. आज पशूसंवर्धन विभागाचा आढावा घेण्यात आला. यावेळी पशू संवर्धन विभागाचे डॉ. वाय. एस. वंजारी, डॉ. शशिकांत कानफाडे, डॉ. संदिप इंगळे, डॉ. शिवेंद्र महल्ले, डॉ. सुधीर चौधर, डॉ. राजेंद्र पेठे, डॉ. दिलीप देशमुख आदी उपस्थित होते.

श्रीमती मुंडे म्हणाल्या, पशूंच्या आरोग्याची चांगल्या पद्धतीने काळजी घ्यावी. जिल्ह्यात प्रयोगशाळा आणि चिकित्सागृह असावेत, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. प्रामुख्याने तालुकास्तरावर घरपोच सेवा देण्यात यावी. गोशाळांमध्ये चांगल्या दर्जाच्या सुविधा असाव्यात. गोशाळेला तारेचे कुंपण घालण्यात यावे. याठिकाणी दाखल होणाऱ्या पशूंना योग्य उपचार करण्यात यावे.

देशी गाय परिपोषण योजनेतून तीन हजारावर गायींना अनुदान देण्यात आले आहे. त्यासोबच मानव विकासमधून दुधाळ जनावरे वाटप आणि प्रशिक्षण देण्यात येत आहे. या वाटप करण्यात आलेल्या जनावरांची माहिती ठेवावी. तसेच त्यांना आवश्यक असलेली मदत पुरविण्यात यावी. दुधाळ जनावरांना वैरणाची आवश्यकता असल्याने वैरण विकास कार्यक्रमामधून कामे घेऊन चाऱ्याची व्यवस्था करण्यात यावी. महामेष योजनेतून २१७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. यावर विशेष लक्ष ठेवण्यात यावे. यावेळी श्रीमती मुंडे यांच्या हस्ते गोशाळा नोंदणीचे प्रमाणपत्र प्राधिनिधीक स्वरूपात वाटप करण्यात आले. यानंतर त्यांनी पर्यावरण विभागाचा आढावा घेतला. महानगरपालिका क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या यंत्रणेची कार्यक्षमपणे हाताळणी करावी. प्रामुख्याने नागरी क्षेत्रात पाण्यावर प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी संबंधित यंत्रणेला सूचविण्यात यावे. विभागातील सांडपाणी प्रक्रियेसाठी लागणारे पाणी गोळा करण्यासाठी संबंधित पालिकांना व्यवस्था करण्यास सांगावे. उद्योग क्षेत्रात वायू आणि जलप्रदूषणाच्या तक्रारी येतात. या तक्रारींची तातडीने दखल घेऊन त्याबाबत उपाययोजना करण्यास प्रकल्पांना सांगावे. अमरावतीमध्ये वस्त्रोद्योग आहे. त्याठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा तपासण्यात यावी. वीज निर्मिती केंद्रामधून वायू प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी येतात. त्यामुळे प्रकल्पामधून निघणारी राख आणि सांडपाण्याचे नियोजन करावे, असे निर्देश श्रीमती मुंडे यांनी दिले.

# एका दिवसात १,२१४ कृषी केंद्राची तपासणी

### जिल्हा कृषी अधिक्षक राहूल सातपुतेची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती–**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे संकल्पनेतून शनिवारी १३ जून रोजी एक दिवस बळीराजा साठी एक दिवसीय अभियान राबविण्यात आले. या अभियानात अधिकारी कर्मचाऱ्यांनी १,४३४कृषिनिविष्ठा केंद्रापैकी १,२१४ कृषि निविष्ठा केंद्राची सर्वसाधारण तपासणी करण्यात आल्याची माहिती जिल्हा कृषी अधिक्षक राहूल सातपुते यांनी दिली.

या अभियानामध्ये सर्व ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी, सहायक कृषि अधिकारी, उपकृषि अधिकारी, मंडळ अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी आदी कर्मचारी, अधिकारी यांची प्रत्येक कृषि निविष्ठा विक्री केंद्रावर एक याप्रमाणे नेमणूक करुन त्यांच्या उपस्थितीत संपूर्ण दिवसभर



बियाणे, खते वकिटनाशके निविष्ठांची विक्री होणेबाबत तसेच कृषि केंद्रातील सर्वसाधारण बाबींची तपासणी करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. त्याचप्रमाणे कृषि निविष्ठा बियाणे, खते यांची एमआरपी पेक्षा जादा दराने विक्री करणे, बियाणे, रासायनिक खते यांचे सोबत इतर निविष्ठांचे लिकींग करणे, बियाणे, रासायनिक खते उपलब्ध असून नदेणे, अनधिकृत बियाण्यांची विक्री करणे, बोगस किटकनाशके विक्री करणे इत्यादी प्रकारच्या तक्रारी अनुषंगाने तपासणी करण्यात आली. अभियान दरम्यान जिल्ह्यातील एकुण १,४३४ कृषि निविष्ठा केंद्रांपैकी १,२१४ कृषि निविष्ठा केंद्राची सर्वसाधारण तपासणी करण्यात आली आहे. उर्वरीत २२० पैकी काहींचेतपासणी अहवाल प्राप्त व्हायचे आहेत. काही कृषि केंद्रे ही बंद असल्याचे आढळून आले. कृषि केंद्रांचे नाव ठळक अक्षरामध्ये आहे का, परवाना दर्शनी भागात लावलेला आहे का आदी विविध बाबी तपासण्यात आल्यात.

# विद्यार्थ्यांना आता शाळेतच मिळणार एसटी पास - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती–** महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांना आता एसटी बस पाससाठी रांगेत उभे राहावे लागणार नाही. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्थानिक प्रशासनाला पास शाळा–महाविद्यालयांतच वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने (चडठढउ) एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम सुरू केली आहे.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, नवीन शैक्षणिक वर्ष १६ जूनपासून सुरू होत आहे. विद्यार्थ्यांना घरापासून शाळेपर्यंत प्रवासासाठी ६६.६६% सवलतीसह केवळ ३३.३३% रक्कम भरून मासिक पास मिळेल.

तसेच, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींना मोफत पास दिले जातात. पूर्वी पाससाठी विद्यार्थ्यांना आगारात किंवा पास केंद्रावर रांगेत उभे राहावे लागत होते. आता शाळा–महाविद्यालयांनी दिलेल्या



यादीवरून एसटी कर्मचारी थेट शाळेत पास वितरित करतील. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचेल आणि शैक्षणिक प्रगतीला बाधा येणार नाही.या संदर्भात १६ जुन पासुन एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत हि विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे.या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी–विद्यार्थिनींना होणार आहे.असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी प्रसिद्धीपत्रकातुन केले. त्यामुळे या उपक्रमाला राज्यातील विविध शाळा–महाविद्यालयांकडून कसा प्रतिसाद मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एसटी बसने राज्याच्या विविध भागात रोज लक्षावधी प्रवासी प्रवास करत असतात. एसटीची वाहतूक सुरक्षित असल्याने प्रवासी जास्त असल्याचा एसटीचा दावा आहे. दरम्यान एसटीच्या चालकांना नियमित प्रशिक्षण देण्यासह बसची नियमित देखभाल– दुरुस्ती केली जाते. त्यामुळे एसटीचा प्रवास सर्वात सुरक्षित असल्याचा एसटी महामंडळाचा दावा आहे.

# गरजू शेतकऱ्यांना सोयाबीन बियाणे बॅग प्रदान

### अध्यक्ष प्रकाश साबळेच्या हस्ते वितरण

### राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६अमरावती : २२**नया अकोला येथेराजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे तसेच हेल्पिंग हँड ग्रुप अमरावती च्या प्रयत्नातून ७ गरजू शेतकऱ्यांना महाबीज सोयाबीन बियाण्याच्या बॅगा प्रदान करण्यात आल्या.यामध्ये पूजदा येथील शेतकरी गणवीर, नांदुरा येथील विलास घुरडे, थुगाव येथील रामकृष्ण मेटांगे, जयवंतबाई छापाणी, नथुजी सोनटक्के, नामदेवराव ठाकरे, रामकृष्ण अंभोरे ह्या गरजू शेतकऱ्यांना बियाण्याची मदत करण्यात आली.राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसोबत संवाद साधून त्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका गेल्या किती वर्षापासून राबवित असल्याबाबतचे मत प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी ज्ञानेश्वर टिपरे, अक्षय साबळे, सौरभ विधे, तुषार भोकरे, ऋतिक चौधरी, यश रुद्रकार आदी मंडळी उपस्थित होती.

# वादळी वारे, ढगांचा गडगडाट, विजा कडाडल्या पावसाचे थैमान, झाडे पडली, वीजपुरवठा खंडीत




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती–** रविवारी दुपारनंतर तब्बल तीन तास शहरातील अनेक भागात वादळी पावसाने धुमाकूळ घातला. जोराचे वारे, ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट असा पावसाचा तांडव सुरु राहिला. अनेक भागात झाडे कोसळून पडली, तर नाल्यांमध्ये साचलेला कचरा रस्त्यांवरुन वाहू लागला. पावसाळामुळे अनेक भागातील वीजपुरवठा रात्री उशिरापर्यंत खंडित झालेला होता.रविवारी दुपारी २-३० वाजतानंतर वातावरण बदलले.ढगांचा गडगडाट सुरु झाला. जोराचे वारे वाहू लागले. निसर्गाने रोहरुप धारण केले. पाहता पाहता जोराचा पाऊस सुरु झाला. मान्सूनच्या पहिल्या पावसाने जोरदार तांडव केले. सुमारे तीन तास पावसाचे थैमान सुरु राहिले. वादळी पावसामुळे अनेक भागाती झाडे पडली. काही ठिकाणी रस्त्यावर झाडे पडल्याने, वाहतूक ठप्प झाली. या पावसाने महावितरण आणि मनपा प्रशासनाला मात्र उघडे पाडले.मनपाच्या उद्यान, अग्नीशमन आणि अतिक्रमण विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार अनेक भागात झाडे पडली. सर्वाधिक झाडे पडल्याचे प्रकार साईनगरात घडले. साईनगर, नवाथे, रवि नगर, पार्वती नगर, अंबा विहार, छाया नगर, अयोध्या विहार, दीप नगर प्रभु कॉलोनी, दस्तूर नगर, जेवडनगर, मोती नगर, यशोदा नगर, पुराना बाईपास, स्वस्तिक नगर, राजापेठ, नंदा शोरूम, बियाणी कॉलेज, सद्गुरू प्लॉट, – गोपालनगर, प्रसाद कालोनी अणि वलगांव रोड या भागात झाडे पडल्याने रस्ते ठप्प झाले. मनपाच्या उद्यान, अग्नीशमन आणि अतिक्रमण विभागने ही झाडे हटविण्याचे काम युध्दस्तरावर सुरु केले.

## टिल्लू मशीनव्दारे प्रवाशी ऑटोत भरत होते गॅस

### गुलिस्ता नगरात अवैध गॅस रिफिलिंग अड्डयावर धाड



विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ अमरावती १३गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने नागपुरीगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गुलिस्ता नगरात युसूफ हॉलजवळ घरगुती गॅस सिलेंडरमधून ऑटोमध्ये अवैधरित्या गॅस रिफिलिंग अड्डयावर धाड टाकली. पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याच्या ताब्यातून ८ घरगुती गॅस सिलेंडर, २ प्रवाशी ऑटो, टिल्लू मशीन, वजन काटा असा एकूण ३ लाख १९ हजार ७०० रूपयांचा ऐवज जप्त केला आहे.

शब्बीर खान ईब्राहिम खान (५२) रा. गुलिस्ता नगर, युसूफ हॉल जवळ असेअटकेतील आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, गुलिस्ता नगर परिसरातील युसूफ हॉल येथे घरगुती एलपीजी गॅस सिलेंडर अवैधरित्या ऑटोमध्ये रिफीलींग होत असल्याची गोपनीय माहिती गुन्हेशाखेचे प्रमुख पीआय गोरखनाथ जाधव यांना मिळाली. त्यानुसार पीआय गोरखनाथ जाधव यांनी त्यांच्या पथकातील एपीआय मनीष वाकोडे, पीएसआय प्रकाश झोपाटे, हेड कॉस्टेबल सतीष देशमुख, फिरोन खान, सचिन बहाळे, प्रशांत मोहोड, अलीमउददीन खतीब, नाझीमउददीन सैयद, विकास गुढथे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, रंजित गावंडे यांच्यासह मिळून तात्काळ शब्बीर खानच्या अड्ड्यावर धाड घातली.

## शेतकऱ्यांच्या जिवावर उठलं सरकार समिती कशाला थेट कर्जमाफी का नाही?–यशोमती ठाकूर यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आता समिती कशाला हवी ?, थेट कर्जमाफीचा निर्णय सरकार का जाहीर करत नाही ?. हे सरकार शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेलंसरकार असूनदुर्योधन–दु:शासनासारखं बळीराजाचं वस्त्रहरण करण्याच पाप करत असल्याची टिका माजी मंत्री ॲड यशोमती ठाकूर यांनी महायुती सरकारवर केली.ॲड यशोमती ठाकूर म्हणाल्या की, मे महिन्यात शेतीच्या कामासाठी सुरुवात केली असता पावसाने शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. कधी नैसर्गिक आपत्तीमुळे तर कधी जनावरांमुळे शेतीचंअनेकदा नुकसान होतं मात्र असं असून शासन दरबारी देखील शेतकऱ्यांची नाराशाच होते. या सरकारला भाऊ मानून बहिणींनी विधानसभा निवडणुकीत साथ दिली. मात्र शेतकऱ्यांच्या डोक्यावरचा कर्जाचा डोंगर तसाच ठेऊन त्यांना आत्महत्या करायला भाग पाडून लाडक्या बहीणींच कुंकू पुसण्याच पाप हे सरकार करत आहे, अशी टीका काँग्रेस यशोमतीठाकूर यांनी केली. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आणि इतर मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मागील ७ दिवसांपासून मोझरी येथे सुरु असलेले अंन्नत्याग आंदोलन शेतकरी कर्जमाफीबद्दल समिती नेमण्याबाबतच्या आश्वासनानंतर शनिवारी स्थगित केले. या आंदोलनाला



राज्यातील अनेक संघटना, राजकीय पक्षलोकप्रतिनिधींनी जाहीर पाठींबा दिला होता. कर्जमाफीबद्दल समिती नेमून अहवाल मागविणार मग बैठका घेणार म्हणजे सरकारला केवळ वेळ काढायचा आहे का ? असासवाल यशोमती ठाकूर यांनी उपस्थित केला आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, शेतकऱ्यांसाठी सुरु केलेली १ रुपयात पीक विमा योजना सरकारने बंद केली, पीक नुकसान भरपाईच्या निकषात बदल करुन नुकसान भरपाईच्या रकमेत कपात केली. शेतमालाला भाव नाही, खतांच्या बियाणांच्या किमतीं वाढल्या, बोगस बियाणांच्या विक्रीवर सरकार ठोस पावले उचलत नाही. शेतीला वीज उपलब्ध होत नाही, त्यामुळे आज राज्यातील शेतकरीहतबल झाला आहे. अशावेळी सरकार शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी तगादा लावत आहे, सरकारची ही वृत्ती शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणे आहे, अशी टीका यशोमती ठाकूर यांनी केली आहे. कर्ज, नापीकी, अवकाळी पाऊस तसेच सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांना कंटाळून शेतकऱ्यांनी आपलं जीवन संपवलं आहे. यात विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्येचा आकडा अधिक आहे. मागील अधिवेशनात वर्षभरात राज्यात २ हजार ७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती सरकारने विधिमंडळात दिली होती.मागील सहा महिन्यात राज्यात ८६९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत

## फुक मारून मंत्र म्हटले, पुडीत बांधून दिला रुद्राक्ष

### चेनला हात लावून राख पाडल्याने विश्वास ठेवणे भोवले, कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना

## २ ढोंगी साधुंनी व्यापाऱ्याची चेन उडविली

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ अमरावती,** सकाळी दुकान उघडल्यानंतर दुकानदार साफसफाई करित असताना दोन ढोंगी साधून दुकानात आले. साधूने दुकानदाराला पुडीत १०० रूपये व रूद्राक्ष बांधून दिले. गळयातील चैनला हात लावून राख पाडल्याने दुकानदाराचा साधूंवर विश्वास बसला. परंतु, साधूने डोक्यावर हात ठेऊन आशिर्वाददेण्याच्या बहाण्याने व्यापाऱ्याच्या गळयातील १० ग्रॅमची ६० हजाराची सोन्याची चैन लंपास केली. कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या बच्छराज प्लॉटमध्ये ही घटना घडली. श्लोक सतीश गुप्ता (२७)रा. बच्छराज प्लॉट असे फसवणूक झालेल्या तक्रारदारांचे नाव आहे. माहितीनुसार, श्लोक गुप्ता यांचे बच्छराज प्लॉटमध्येच कपडयाचे दुकान आहे. नेहमीप्रमाणे श्लोक यांनी १३ जून रोजी सकाळी दुकान उघडले आणि ते नोकरासोबत मिळून



दुकानाची साफसफाई करित होते. तेवढ्यात दोन अज्ञात साधू त्यांच्या दुकानात आले. साधूंनी चहा मागिल्याने श्लोक यांनी नोकराला चहा आणण्यासाठी बाहेर पाठविले. श्लोकने दोन्ही साधूंच्या पाया पडून त्यांना १० रूपये दक्षिणा दिली. साधूंनी ते १० रूपये, खारिक व रूद्राक्ष एका पुडीत बांधून श्लोक यांना दिले. थोळयावेळी डोळे बंद कर आणि नंतर पुडी उघडून पहा, असे सांधूनी श्लोकला म्हटले. श्लोकने थोळयावेळ डोळे बंद करून पुढील उघडली असता त्यामध्ये १०० रूपये, १० चा कॉईन, रूद्राक्ष, कॉईन दिसल्याने श्लोकला सांधूंवर विश्वास बसला. श्लोक पुन्हा साधूच्या पाया पडण्यासाठी वाकला असता सांधूनी त्याच्या गळ्यातीलसोन्याच्या चैनला हात लावून राख पाडली आणि तीराख उचलून पुडीत बांधून श्लोकलादिली. त्यानंतर साधून श्लोकला त्याच्या कॅबीनच्या खुर्चीमध्ये त्याला बसवून तेथून निघून गेले. परंतु, थाळया वेळाने गळ्यातील चैन लंपास झाल्याचे लक्षात येताच श्लोक गुप्ताने तात्काळ कोतवाली पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी दोन अज्ञात साधूंविरोधात गुन्हे दाखल केले

## मुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती

### आरएसएसच्या बैठकीत तब्बल पाच तास मंथन



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६नागपूर,** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपच्या मदतीसाठी पुन्हा आरएसएस धावून आल्याचं दिसतंय. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची रविवारी नागपुरात महत्त्वाची बैठक झाली. तब्बल पाच तास मुख्यमंत्री फडणवीस या बैठकीला उपस्थित होते. हे बळ निवडणुकांना भाजपसाठी स्थानिक पातळीवर काय करिष्मा दाखवणार याची उत्सुकता आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे पडघम वाजूलागलेत. त्यातच भाजपच्या मदतीला पुन्हाएकदा संघसरसावल्याचंदिसून येत आहे. नागपुरात डॉ. हेडगेवार स्मृती भवन परिसरात संघाचं आणि परिवारातील संस्थांचं मंथन सुरू आहे. एरवी अशा बैठका हा संघाचा नियमित उपक्रम असला तरी या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. तब्बल पाच तास फडणवीस या बैठकीला होते. त्यांच्यासोबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि विदर्भातले भाजप मंत्री आणि विदर्भातले जवळपास सर्व आमदारही उपस्थित होते. या उपस्थितीमुळे ही भाजप आणि संघाची समन्वय बैठकच होते हे निश्चित झालं. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकांच्या पूर्वीही अशाच पद्धतीने संघ आणि भाजप मध्ये अनेक बैठका पार पडल्या होत्या. त्यानंतर आलेल्या विधान सभा निवडणुकांच्या निकालांच्या माध्यमातून संघाने त्या निवडणुकीत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या काय भूमिका बजावली हे पण सर्वांसमोर आले होते.

## जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी करण्यास कारणीभूत शिक्षकांविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही रद्द करा

### शालेय शिक्षणमंत्री,ग्रामविकास मंत्री,शालेय सचिव,शालेय शिक्षण आयुक्त यांना प्राथमिक शिक्षक समितीचे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती –** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची पटसंख्या १० पेक्षा कमी असण्यासाठी शिक्षकांना जबाबदार धरून बुलढाणा जिल्ह्यातील २० शाळांतील सुमारे ३५ शिक्षकांना निलंबित करण्याचे आदेश बुलढाणा जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्गत केले आहे. निलंबनाचे आदेश ज्या आरोपामुळे निर्गत करण्यात आला तो आरोपच मुळात अनाकलनीय, अतार्किक, अव्यवहार्य असल्याने अन्यायकारक आहे अशी निलंबित शिक्षकांनीच नव्हे तर राज्यातील सर्वच शिक्षकांची संतप्त प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून दादाजी भुसे,शालेय शिक्षणमंत्री,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, यांना प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी निवेदनाद्वारा व्यक्त केले आहे.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख यांनी कळविले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील अनेक शाळांत १० पेक्षा कमी पटसंख्या आहे. कमी पटसंख्या असणे हा गुन्हा आहे का? शिक्षण हक्क कायदा आणि त्यापूर्वीच्या शैक्षणिक धोरणानुसार पुरोगामी महाराष्ट्रात प्रत्येक खेडेगावात शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरण ासाठी (प्रत्येक गाव, दुर्गम भाग, वाडी–वस्ती, तांडा) येथे शिक्षण पोहोचावे यासाठी लोकसंख्येचा विचार न करता दर १ किमी अंतरावर शाळा शासनाने उघडल्या ते धोरण चुकीचे होते का आणि ज्या धोरणकर्त्यांनी/अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावात शिक्षणाची सोय केली ते गुन्हेगार होते का?कल्याणकारी व्यवस्थेत प्रत्येक गावात किमान प्राथमिक शिक्षणाची सोय असलीच पाहिजे. या सामाजिक न्यायाच्या तत्वास अनुसरून छोट्या–छोट्या गावात शाळा उघडण्यात आल्या आहेत. अनुसरू कालांतराने शासनाने अनेक खाजगी संस्थांना इंग्रजी माध्यमाच्या शाळा कुठेही उघडण्यास खुली सूट दिली. जागोजागी स्वयं अर्थसहायित शाळांचे पेव फुटले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांत पुरेसे शिक्षक नसणे. असलेल्या शिक्षकांना अशैक्षणिक कामात गुंतवून ठेवणे, जपश्रळपश कामाचा ससेमिरा, आवश्यक सुविधांची वानवा अशा एक ना अनेक कारणांमुळे पालक आपल्या पाल्यांना नाईलाजाने खाजगी शाळांत प्रवेशित करायला लागले.शिक्षण हक्क कायद्यातील कलम १२, नियम–७ नुसार वंचित घटकांच्या पाल्यांना खाजगी कॉन्व्हेंट मध्ये प्रवेश घेण्यासाठी (२५%) सोय शासनानेच उपलब्ध करून दिली. ग्रामीण भागात रोजगार अनुलब्धता, शेती व्यवसायाची बिकट स्थिती या व अशा अनेक कारणांमुळे रोजगारासाठी अनेक कुटुंबाचे शहरात स्थलांतर झाले. सोबतच लहान कुटुंबाचे महत्त्व लोकांना कळल्यामुळे जनन दर कमी झाला आहे. अशी अनेक कारणे शाळांची पटसंख्या कमी होण्याची आहेत. मात्र शाळेची पटसंख्या कमी होण्यास केवळ शिक्षकच जबाबदार आहे अशा प्रकारची काही यंत्रणांची भूमिका अनाकलनीय, अतार्किक आणि समजण्यापलीकडची आहे.३५ शिक्षकांना कमी पटसंख्येसाठी जबाबदार धरून निलंबनाची कारवाई केली या अभूतपूर्व अशा निर्णयाचे वर्णन शब्दबद्ध सुद्धा करता येत नाही.ज्या कारणामुळे शिक्षकांना निलंबित करण्यात आले ते कारण सर्वथा अनुचित, अनाकलनीय, अतार्किक, अवयवहार्य आणि समजण्यापलीकडेचे असल्याने विनंती करण्यात येते की हेआदेश मागे घेऊन तातडीने निलंबनाची कारवाई रद्द करण्याचे निर्देश संबंधितांना द्यावेत. अन्यथा अशा दहशतीच्या आणि अन्याय्य निर्णयाच्या विरोधात राज्यातील शिक्षकांना तीव्र आंदोलन करण्याशिवाय तरणोपाय राहणार नाही असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून विनंती वजा इशारा निवेदनातुन दिला आहे.=

## शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधा आणि विविध नामांकित कंपनी मध्ये रोजगार संधी उपलब्ध

### सन २०२४–२५ मध्ये एकूण २६७ विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ अमरवती –** शासकीय तंत्रनिकेतन अमरावती विदर्भातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेची स्थापना १९५५ मध्ये झाली असून १९९५ मध्ये संस्थेला शैक्षणिक स्वायत्तता लाभली आहे.संस्थेत एकूण ९ विद्याशाखा स्थापत्य, यंत्र, विद्युत, अणू विद्युत, संगणक, माहिती तंत्र ज्ञान, औषधं निर्माण शास्त्र, प्लास्टिक पॉलिमर, रसायन असून त्यापैकी ६ एन बी ए नामांकन प्राप्त आहेत.संस्थेचा ६२ एकर विशाल परिसर असून विविध इमारती, प्रशस्त क्रीडांगणे,तसेच अद्ययावत पुस्तकांनी परिपूर्ण असे सुसज्ज ग्रंथालय आहे.प्रयोगशाळाअत्याधुनिक उपकरणे, यंत्र सामुग्री, रसायने युक्त आहेत.संस्थेत उच्च विद्या विभूषित व अनुभवी प्राध्यापक वर्ग आहे.तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी साठी अनुक्रमे एक व दोन वसतिगृह सुविधा, इंटरनेट व इतर सुविधा उपलब्ध आहेत.संस्थेची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम असून दरवर्षी दर्जेदार कंपनी मध्ये मुलाखती द्वारे बहुसंख्य विद्यार्थ्यांची निवड केली जाते आणि निवड झालेल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पॅकेज दिल्या जाते. २०२४–२५ या शैक्षणिक वर्षांत आता पर्यंत एकूण २६७ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यामध्ये, जसे बजाज ऑटो लिमिटेड, जी. इ. ऐरोस्पेस, बॉश, अल्ट्रा टेक सिमेंट, सिगा इंजिनीरिंग सोलुशन, पुणे, टाटा पॅसेंजर मोबीलिटी,रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड इ. मध्ये मुलाखती द्वारे निवड झाली आहे.अल्ट्रा टेक सिमेंट कंपनी द्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ४ लाख प्रति वर्ष एवढे पॅकेज देण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा संस्थेत उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना अंत्यत अल्प शुल्क आकारून शिक्षण पूर्ण करण्याची संधी तसेच शिक्षण व परीक्षा शुल्क सवलत दिली जाते.गरीब व पात्र विद्यार्थ्यांसाठी संस्थेकडून 'नैवेद्य निधी' योजनेतून आर्थिक मदत दिली जाते. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनाचा विद्यार्थ्यांना पुरेपूर लाभ होतो. राज्य सरकार च्या योजनेअंतर्गत मुलींना १००% शुल्क माफ केले आहे.विद्यार्थ्यांना



नामांकित कंपनी मध्ये निवड होण्याची संधी मिळते. तसेच संस्थे तर्फे विद्यार्थ्यांना मुलाखत पूर्व मार्गदर्शन आणि रोजगार संधी उपलब्ध व्हावी म्हणून कार्यक्षम प्रशिक्षण व आस्थापना विभाग उपलब्ध आहे. संस्थेत नोंदणीकृत माजी विद्यार्थी संघटना सक्रिय आहे. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या म्हणून विविध नामांकित कंपन्यामध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत माजी विद्यार्थी सुद्धा आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना रोजगारासाठी प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांच्या आर्थिक विकासासाठी मोलाचे सहकार्य करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पाठयक्रम संस्थेत लागू केला असून द्विभाषिक शिक्षण प्रणाली अवलंबन केली आहे. विद्यार्थ्यांसाठी इतर उल्लेखनीय सुविधा देखील संस्थेत उपलब्ध आहेत.महाराष्ट्र शासनाने संस्थेला नुकतेच सेंटर ऑफ एक्सलन्स, इंटरनेट ऑफ थिंग्स व थ्रीडी प्रिंटिंग या विषयांमध्ये दिलेले असून या संस्थेच्या सर्व विभागातील विद्यार्थ्यांना भरपूर उपयोग होत आहे व नवीन तंत्रज्ञानावर विकसित असलेले सर्व मॉडेल्स वापरून विद्यार्थी नवीन प्रोजेक्ट तयार करत आहेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी खूप चांगल्या प्रकारे उपलब्ध होईल हा सुद्धा याच्या मागचा एक उद्देश आहे.महाराष्ट्र शासनाच्या सीईटी सेलद्वारे नवीन २०० कम्प्युटर असलेले सुसज्ज असे २ संगणक कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. येथे विद्यार्थ्यांच्या (आभासी पद्धतीने) ऑनलाईन परीक्षा घेण्यात येतात. तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाइनच्या माध्यमातून ई–बुक्स द्वारे विषयाचे अभ्यास साहित्य सुद्धा डाऊनलोड करून ठेवता येते व तसेच संस्थेच्या व विभागातील अंतर्गत विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या ऑनलाइन परीक्षा सुद्धा तिथे घेण्यात येतात.जिल्हा नियोजन समिती अमरावती तर्फे या संस्थेच्या सर्व विभागांना स्मार्ट क्लासरूम (एकूण २२) देण्यात आलेल्या असून याचा फायदा प्राध्यापक व विद्यार्थ्यांना शिकवणी करिता व प्रशिक्षण घेण्याकरिता खूप चांगल्या प्रकारे होईल.

# विधानसभेची चूक पुन्हा करू नका उद्धव ठाकरेंचा शाखाप्रमुखांना दम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**



विधानसभेची चूक पुन्हा करू नका. मुंबई महापालिकेवर भगवा फडकवण्यासाठी कामाला लागा. आपण जी कामे करून दाखवली, ती महायुती सरकारने कशी घालवून दाखवली, हे जनतेपर्यंत पोहोचवा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी शाखाप्रमुखांना दिले.


मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे यांनी मुंबईतील विभाग प्रमुख आणि सर्व २२७ शाखा प्रमुखांच्या दोन बैठका रविवारी शिवसेना भवनमध्ये घेतल्या. यावेळी ते बोलत होते. विधानसभा निवडणुकीत उद्धवसेनेला पूर्ण राज्यात २० जागांवर समाधान मानावे लागले, तर बंड करून बाहेर पडलेल्या एकनाथ शिंदे यांना ५७ जागांवर यश मिळाले होते.

आपल्याला मुंबई महापालिकेवर भगवा फडकवायचा आहे, असे सांगतानाच विभागप्रमुख, उपविभागप्रमुख, विधानसभा संघटक, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख यांनी शाखांना भेटी देण्यासारखे विविध कार्यक्रम आयोजित करा. महाविकास आघाडीच्या काळात मी मुख्यमंत्री होतो. त्यावेळी मुंबईकरांना दिलेल्या सोयी-सुविधांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवा आणि महायुती सरकारच्या काळात कशा सुविधा कमी झाल्या हे जनतेपर्यंत जाऊ द्या, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले.उद्धवसेनेचे २० पैकी १० आमदार एकट्या मुंबईतून निवडून आल्याने आता त्यांची सगळी भिस्त मुंबईवर आहे. मुंबई महापालिका उद्धवसेनेसाठी प्रतिष्ठेची मानली जात आहे. त्यामुळेच उद्धव ठाकरे यांनी शाखा प्रमुखांना संबोधित करताना 'विधानसभेची चूक पुन्हा करू नका,' असा दम भरला आणि जनतेशी संपर्क ठेवा, गटप्रमुख, पोलिंग एजंट, मतदार याद्या तयार ठेवा. जनतेशी संपर्क ठेवा, गाफील राहू नका, असा सल्ला दिला.

# आगामी निवडणुकीत युतीबाबतचा निर्णय स्थानिक पातळीवर घेणार- शरद पवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये युतीबाबतचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाईल, असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी रविवारी स्पष्ट केले. शरद पवार गटाच्या वर्धापन दिनानिमित्त घाटकोपर येथे पक्षाच्या मुंबई अध्यक्षा राखी जाधव यांनी आयोजित केलेल्या संकल्प शिबिरात मार्गदर्शन करताना पवार बोलत होते. या शिबिराला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे उपस्थित होते.



पवार म्हणाले की, आपल्याला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळाले पण ती स्थिती विधानसभेला राहिली नाही, याचे कारण सांगणे अवघड आहे. पण निवडणूक यंत्रणेच्या संबंधी लोकांच्या मनात संशयाचे वातावरण आहे. याबाबत राहुल गांधी यांनीही एक लेख लिहिला आहे. हा निकाल आपल्यालासुद्धा अस्वस्थ करणारा होता.

आपल्याला महापालिकेच्या निवडणुकांना सामोरे जायचे आहे. त्या-त्या शहरात, त्या-त्या जिल्ह्यातील सहकाऱ्यांनी एकत्र बसावे आणि निवडणुकीला एकट्याने सामोरे जायचे की समविचारी पक्षांबरोबर जायचे याचा निर्णय घ्यावा, असे सांगत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युती करण्याचे अधिकार पक्षाने स्थानिक स्तरावर दिले असल्याचे पवारांनी स्पष्ट केले.

# अमझरीत केंद्र शासनाची 'होम स्टे' योजना : पर्यटकांना होणार आदिवासी संस्कृतीचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक ३० दि.१६चिखलदरा**

केंद्र शासनाच्या वतीने पर्यटकांना आदिवासींचे जीवन जवळून अनुभवता यावे यासाठी राज्यातील बारा जिल्ह्यांचे सर्वेक्षण करून शबरी आदी पर्यटन योजनेत २५ गावे निवडली आहेत; त्यामध्ये चिखलदरा तालुक्यातील ग्राम अमझरी (खटकाली) या गावाची निवड करण्यात आली आहे. राज्यातील पंचवीस पाड्यांवरील आदिवासी जीवन अगदी जवळून अनुभवण्याची संधी पर्यटकांना लवकर मिळणार आहे. केंद्र शासनाच्या आदिवासी




मंत्रालयाद्वारे पर्यटनपूरक आदिवासी गावे निवडून प्रत्येक गावामध्ये पाच लक्ष रुपये होम स्टे योजनेकरिता देण्याची तरतूद केली आहे. राज्यातील १२ जिल्ह्यांमधील २५ गावांकरिता १३.७५ कोटी रुपये केंद्र शासनाने यापूर्वीच मंजूर केले होते.

राज्य शासनाने ९.९९ कोटी रुपये या योजनेसाठी मंजूर केले असून सदर योजनेकरिता एकूण २३.७४ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक गावाकरिता ९४.९६ लाख रुपये एवढा खर्च करण्यात येणार असून आदिवासी गावांमध्ये प्रत्येकी पाच लक्ष रुपये अनुदानित दहा होम स्टेचे बांधकाम करून देण्यात येणार आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शबरी आदिवासी विकास मंडळाद्वारे ग्राम पर्यटन समितीची स्थापना करण्यात येणार आहे. पायाभूत सुविधांसाठी वेगळा खर्चही करण्यात येणार आहे. शबरी आदी पर्यटन योजना राबविताना पर्यटकांना आदिवासी जीवन शैलीचा अनुभव देणे, पर्यटनासाठी उत्पन्नाचे नवेस्त्रोत निर्माण करणे, आदिवासी कला संगीत नृत्य आणि हस्तकलेचा प्रचार करणे, शाश्वत पद्धतीचा अवलंब करून पर्यावरणाचे रक्षण करणे, पर्यटकांसाठी स्मरणवस्तूची दुकाने निर्माण करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेमुळे आमझरी गावाच्या शिरपेचात पुन्हा नव्याने मानाचा तुरा खोवल्या गेला आहे. नुकतीच या गावाला आदिवासी विकासमंत्री प्रा. अशोक उईके यांनी भेट दिली. यावेळी आ. केवलराम काळे व स्फुर्ती क्लस्टरचे संचालक सुनील भालेराव यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर उपस्थित होते.

# लोकसहभागातून दारापूर-शेंडगाव येथील नेत्रहीन वर-वधूचा विवाह संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६दर्यापूर**



दररोज अनेक विवाह सोहळे आपल्या अवती-भवती होत असतात. त्याबद्दल आपल्याला फारसे नवलही वाटत नाही. परंतु जन्मताच दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेलेल्या आणि दोन परस्पर जातीतील दिव्यांगाच्या विवाह सोहळ्याने मात्र सर्वांच्याच आनंदाश्रूंना वाट मोकळी करुन दिली.

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचे मूळ गाव असलेल्या दारापुरचा 'वर' अन् संत गाडगेबाबांची जन्मभूमी असलेल्या शेंडगावची 'वधू' असे हे विवाहबंधनात अडकलेले दिव्यांग दाम्पत्य आहे. या विवाह सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य असे की यासाठी महसुल विभागाचे अधिकारी-कर्मचारी, काही सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांनी पुढाकार घेतला. पुढाकार घेणारे हेच नागरिक वर-वधूचे नातेवाईक बनले आणि त्यांनी या दोघांचा विवाह जुळवून आणला. या नेत्रदीपक सोहळ्याला तालुक्यातील अनेक नागरिक उपस्थित होते.

दर्यापुर तालुक्यातील दारापुरचे निवृत्ती वानखडे व अंजनगाव सुर्जी तालूक्यातील शेंडगाव येथील संगीता सोळंके हे जन्मताच दोन्ही डोळ्यांनी दिव्यांग आहेत. निवृत्तीने परिस्थितीवर मात करीत उच्च शिक्षण घेतले तर संगीतानेही १२ वीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. या दोघांचेही लग्न झाले पाहीजे यासाठी अंजनगाव सुर्जी येथील एक दिव्यांग पुंजाराम राऊत यांनी पत्रकार अशोक पिंजरकर यांच्याकडे विषय काढला. दिव्यांगाच्या क्षेत्रात कार्य करणारे पिंजरकर यांनी पुढे दोन्ही कुटुंबासोबत संपर्क साधून हा विवाह घडवून आणला. सर्वप्रथम त्यांनी अंजनगाव सुर्जी येथील तहसीलदार पुष्पा सोळंके (डाबेराव) आणि तालूक्यातील पत्रकार यांचेशी चर्चा केली. तहसीलदार यांनी या संपूर्ण विवाह सोहळ्याची जबाबदारी स्वीकारली आणि सर्वांना सोयीची होईल, अशी १३ जून ही तारीख निश्चित केली.

या विवाह सोहळ्याचे निमंत्रण जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ आधिकाऱ्यांना देण्यात आले. माजी लेडी गव्हर्नर तथा सरन्यायाधीशांच्या आई आचार्य कमलताई गवई यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रण दिले गेले. जिजाऊ ब्रिगेडतर्फे वैशाली बोळके यांच्या निवासस्थानी हळदीचा कार्यक्रम पार पडला. तर लग्नाच्या दिवशी नवरदेव नवरीची तयारी करण्याची संपूर्ण जबाबदारीही त्यांनीच घेतली. दरम्यान महसुल कर्मचारी, पत्रकार आणि जिजाऊ ब्रिगेडच्या महिला यांच्यासह तालूक्यातील समाजसेवेचे भान असलेल्यांनी घरचे लग्न असल्याप्रमाणे धावपळ करीत इतर तयारी पूर्ण केली.

आमदार लवटेंचीही उपस्थिती या विवाह सोहळ्याला होती. माजी आमदार रमेश बुंदिले, उपविभागीय पोलीस अधीकारी राहुल गायकवाड, ठाणेदार प्रकाशअहिरे, गटशिक्षणाधिकारी सुधीर खोडे, प्रा.प्रेमकुमार बोके, सप्तखंजेरीवादक संदीपपाल महाराज, रामपाल महाराज, प्रवीण पेटकर, विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# कुलरचा शॉक लागून आईसह दोन चिमुकल्यांचा मृत्यू : चमक येथील घटना





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अचलपूर**

कुलरचा शॉक लागून आईसह दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याची घटना सरमसपुरा पोलिसस्टेशन अंतर्गत चमक येथे शनिवारी रात्री ७ च्या सुमारास घडली. सदर घटनेने हळहळ व्यक्त होत आहे. सुमती लक्ष्मण कासदेकर (३५) असे मातेचे आणि श्वेता लक्ष्मण कासदेकर (४) व विकी लक्ष्मण कासदेकर (३) अशी मृत चिमुकल्यांची नावे आहेत. कुलरमध्ये पाणी टाकत असताना सदर दुर्दैवी घटना घडली.

लक्ष्मण कासदेकर कुटुंबासह चमक वास्तव्यास असून शेतमजुरी करून ते आपला उदरनिर्वाह करतात. नेहमीप्रमाणे लक्ष्मण याच्या स्वताचे थ्रेशरवर ज्वारी मळणी करण्यासाठी लगतच्या खोजनपूर येथे गेले होते. दिवसभराचे काम आटोपून लक्ष्मण कासदेकर घरी परतले होते. घरात प्रवेश करताच त्यांना धक्काच बसला. त्यांची पत्नी सुमती कुलरजवळ पलंगाच्या टेक्याने बसलेल्या पण मृतावस्थेत आढळून आली, तर पलंगावर श्वेता व विकी यांचे शव पडलेले होते. हा प्रसंग पाहून हादरून गेलेल्या लक्ष्मण कासदेकर यौनी आरडाओरड केल्याने शेजाऱ्यांनी त्यांच्या घराकडे धाव घेतली.पोलिस पाटील उमेश खेरोडकर यांनी सरमसपुरा पोलिसांना घटनेची माहिती दिली. घटनेची वार्ता सर्वत्र पसरल्याने चमक बु. सह लगतच्या चमक खुर्द, सुरवाडा येथे पोहोचल्याने घटनास्थळी गर्दी दिसून येत होती. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करीत शवविच्छेदन करण्यासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविले. आई आणि तिच्या दोन लेकरांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.




# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथील गुणवंत विद्यार्थीचा हैदराबाद येथे अभ्यास दौरा : डोमेस्टिक स्टडीटूरला विद्यार्थी विमानाने प्रवास करणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील शिक्षण न देता प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळावा, या उद्देशाने पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती ने इन्स्टिट्यूट स्पॉन्सर्ड डोमेस्टिक स्टडी टूअर चे आयोजन केले आहे. हा विशेष अभ्यास दौरा अमरावती ते हैदराबाद असा असून, १९ ते २२ जून २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या अभ्यास दौऱ्याकरिता विद्यार्थ्यांचे विमानाने जाणे व येणे तसेच पंचतारांकित हॉटेल मध्ये राहण्याचा संपूर्ण खर्च पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या वतीने करण्यात येणार आहे.

या अभ्यास दौऱ्यासाठी केवळ उच्च शैक्षणिक गुणवत्ता व नियमित उपस्थिती असलेल्या ३७ निवडक गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या दौर्यादरम्यान विद्यार्थ्यांना हैदराबाद येथील नामांकित औद्योगिक कंपन्यांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी मिळणार असून, त्याचबरोबर रामोजी फिल्म सिटी, तसेच स्थानिक ऐतिहासिक व शैक्षणिक स्थळांचे प्रत्यक्ष दर्शन होणार आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रक्रियेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळणार असून, देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक वारशाचा अनुभव घेण्याची संधीही उपलब्ध होणार आहे.

# भारत-इंग्लंड कसोटीचे थेट प्रेक्षपण सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नवी दिल्ली**

आयपीएल २०२५ चे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स नेटवर्क आणि जिओहॉटस्टारवर केले जात होते, परंतु आता भारत-इंग्लंड कसोटी मालिकेसाठी हे चॅनल बदलले आहे. आता ही कसोटी मालिका सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर थेट प्रक्षेपित केली जाईल. तर फोनवर या मालिकेतील सर्व सामन्यांचे थेट प्रक्षेपण चाहत्यांसाठी पूर्वीप्रमाणेच जिओ हॉटस्टार ॲपवर केले जाईल.



भारतीय क्रिकेटमध्ये नव्या पर्वाची सुरूवात होणार आहे. कसोटी क्रिकेटमधून विराट कोहली, रोहित शर्मा आणि आर अश्विन यांसारख्या दिग्गजांनी निवृत्ती घेतल्यानंतर, आता नव्या दमाच्या खेळाडूंना संधी मिळाली आहे. इंग्लंड दौऱ्यासाठी टीम इंडिया पूर्णपणे सज्ज झाली असून, यावेळी संघाचे नेतृत्व युवा फलंदाज शुभमन गिलकडे देण्यात आले आहे. शुभमन गिल आता अनुभवी खेळाडूंच्या अनुपस्थितीत युवा खेळाडूंचा ताफा घेऊन थेट इंग्लंडच्या घरच्या मैदानावर कसोटी मालिकेला सामोरा जाणार आहे.


भारत आणि इंग्लंड यांच्यातील ही पाच सामन्यांची कसोटी मालिका शुक्रवार २० जूनपासून सुरू होत असून, क्रिकेटप्रेमींसाठी हा एक ऐतिहासिक टप्पा असणार आहे. गिलच्या नेतृत्वाखालील नव्या टीमकडून चाहते मोठ्या कामगिरीची अपेक्षा करत आहेत. दरम्यान, यावेळी कसोटी सामन्यांचे थेट प्रक्षेपण आणि स्ट्रीमिंगचे चॅनल पूर्णपणे बदलण्यात आले आहे. यावेळी चाहते ही मालिका स्टार स्पोर्ट्सवर थेट पाहू शकणार नाहीत.

# समृद्धी महामार्गावर वाहनांवर दगडफेक करून लूट.. रात्रीचा प्रवास ठरतोय धोकादायक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ नागपूर**

राज्य शासनातील सगळेच मंत्री समृद्धी महामार्गाबाबत स्वत:ची पाठ थोपटून घेत आहे. परंतु या महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांवर दगडफेक करून लुटणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्याची धक्कादायक माहिती खूद्द नागरिकांकडून समाज माध्यमांवर शेअर केली जात आहे. त्यात बिहार, उत्तर प्रदेशांतर आता महाराष्ट्रातही या घटनेबाबत गंभीर टीका करण्यात आली आहे.

समाज माध्यमावरील 'एक्स'वर प्रतिक पाटील या व्यक्तीने काही व्हिडिओ टाकले. सोबत पोस्ट करतांना त्याने लिहले की, समृद्धी महामार्गावर छत्रपती संभाजीनगरहून नागपूरला जातांना बोगद्याचा आसपास वाहनांवर गडफेक करून लुटालूट करणे सुरू आहे. या महामार्गावर पोलीसांसह कोणतीही अत्यावश्यक सेवाही उपलब्ध नसल्याचा दावाही प्रतिप पाटील यांनी केला आहे.



दरम्यान यापूर्वीही समृद्धी महामार्गावर दगडफेक करून लुटमारीच्या घटना घडल्या आहे. त्याबाबतचे गुन्हेही संबंधित पोलीस ठाण्यात नोंदवले गेले आहे. त्यामुळे प्रतिप पाटीलच्या दाव्यानंतर या महामार्गाने प्रवास करणाऱ्यांच्या मनात धडकी भरली आहे.

महाराष्ट्र शासनाने मोठा गाजावाजा करत समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केले होते. मात्र त्यानंतर समृद्धी महामार्गावरील सततच्या अपघातांची मालिका चिंतेचा विषय आहे. आता हे अपघात कमी झाले. परंतु या मार्गावरील प्रवास वाहनावरील दगडफेक व लुटीमुळे धोकादायक ठरत असल्याचा आरोप आता प्रवाश्यांकडून होऊ लागला आहे. दरम्यान छत्रपती संभाजीनगरहून नागपूरला येतांना संभाजीनगरचा बोगदा ओलांडल्यावर नागपूरकडे येतांना १२ किलोमीटरवर या घटना घडत असल्याचा दावा प्रतिक पाटील या व्यक्तीने एक्सवर केला आहे.

# रामलल्लाच्या नावाखाली बनावट प्रसाद योजना : जागरूक व्हा!

## ‘ऑनलाइन प्रसाद’ घोटाळ्याची मालिका! सायबर गुन्हेगारांची नवीन युक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ नागपूर**

आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर तीर्थक्षेत्रे असून, त्या पवित्र ठिकाणी पोहोचता येत नसले तरी तेथील प्रसाद ग्रहण करता यावा, अशी भाविकांची अपेक्षा असते. विशेषतः ज्योतिर्लिंग, वैष्णोदेवी, अयोध्या, काशी, मथुरा इत्यादी ठिकाणच्या प्रसादाकडे भाविक डोळे लावून बसलेले असतात. मात्र, भाविकांच्या याच श्रद्धेचा सायबर गुन्हेगारांकडून दुरुपयोग करण्यात येत आहे. तीर्थक्षेत्रांचा प्रसाद ऑनलाइन डिलिव्हर करण्याची बतावणी करत सायबर गुन्हेगारांकडून जाळे रचण्यात येते. प्रसादाच्या नावाखाली ॲडव्हान्स पैसे मागवून प्रसाद डिलिव्हर करण्यात येत नाहीच. याशिवाय काही महाभाग तर पैसे घेतल्यावर प्रसाद म्हणून स्थानिक दुकानांतील मिठाई वगैरे पाठवितात. अव्वाच्या सव्वा पैसे आकारून अशा पद्धतीने श्रद्धेशी खेळ सुरू असून, भाविकांनी यासंदर्भात अलर्ट होण्याची गरज आहे.




आपल्या देशात श्रद्धेला मोल नाही, असे म्हणतात. याच श्रद्धेच्या नावाखाली काही गुन्हेगारांनी फसवणुकीचे जाळे रचले आहे. केवळ प्रसाद किंवा इतर साहित्यच नव्हे, तर अगदी तीर्थक्षेत्रांच्या धर्मशाळांच्या नावावरही फसवणुकीचे प्रकार प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. इंटरनेट तसेच विविध सर्च इंजिन्सवर सायबर गुन्हेगार प्रसाद किंवा इतर ऑनलाइन सुविधा देत असल्याचे सांगत त्यावर स्वतःचा मोबाइल क्रमांक अपलोड करतात. त्या मोबाइल क्रमांकावर भाविकांनी संपर्क केल्यावर त्यांच्याकडून ॲडव्हान्स पैसे घेण्यात येतात. मात्र, प्रत्यक्षात भाविकांना प्रसाद किंवा इतर साहित्य कधीच मिळत नाही.

प्रसादाच्या नावाखाली घोटाळ्याचा एक प्रकार अयोध्येत समोर आला. अयोध्येतील रामलल्लाच्या प्रसादाच्या नावाखाली ३.८५ कोटी रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. आशिष सिंग नावाच्या आरोपीने यासाठी बनावट संकेतस्थळ सुरू केले होते. त्याने स्वतःला सिएटलमधील नॉर्थ इस्टर्न विद्यापीठात प्राध्यापक असल्याचे भासवले आणि लाखो भाविकांना राम मंदिराचा प्रसाद घरपोच मिळेल, अशी बतावणी केली होती. त्याने देश-विदेशातील भाविकांकडून ऑर्डर्स घेतल्या आणि स्थानिक मिठाई प्रसाद म्हणून डिलिव्हर करणे सुरू केले. श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर घोटाळा समोर आला. असेच प्रकार देशातील इतरही अनेक तीर्थक्षेत्रांबाबत सुरू आहेत.

# दहा कोटी वृक्ष लागवडीत रेशीम विभागाला प्राधान्य दिल्याने वनविभागच ‘साइड ट्रॅक’?

## जिवंत झाडे तेवढी ऑनलाइन, हजारो मृत रोपांचे खड्डेही उरले नाहीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

यंदाच्या हंगामात राज्यात १० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मात्र, यातील चार कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य रेशीम विभागाला दिले असून पारंपरिकपणे वृक्षलागवडीशी संबंधित असलेल्या वन विभागाला 'साईड ट्रॅक' करण्यात आले आहे. याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

राज्यात ३३ टक्के वृक्ष आच्छादन गाठण्यासाठी किमान १५ वर्षांचा कालावधी लागू शकतो. राष्ट्रीय वनधोरणानुसार राज्यात किमान ३३ टक्के भूभाग वृक्ष आच्छादित असणे आवश्यक आहे. मात्र महाराष्ट्रातील सध्याचे वनक्षेत्र केवळ २१.२५ टक्के असून, हे चित्र आंतरराष्ट्रीय पातळीवर समाधानकारक मानले जात नाही. गत तीन वर्षापासून अभिसरण योजनेमुळे वृक्ष लागवड ही हजारोंच्या आत सीमित झाली आहे. वनक्षेत्र वाढविण्यात वन विभाग कमालीचा माघारला आहे. ग्रामपंचायत स्तरावर लागवड करण्यात आलेल्या हजारो रोपांपैकी मोठ्या प्रमाणात रोपे मृतप्राय झाली आहेत. जिवंत रोपांचा आकडा केवळ ऑनलाईन दिसत आहे. याचे मूल्यांकन होणे तेवढेच गरज व्यक्त केली जात आहे.

### हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र

महसूल व वन विभागाने ११ जून रोजी काढलेल्या 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानांतर्गत यंदाच्या पावसाळ्यात १० कोटी वृक्ष लागवड राबविण्याचा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. त्यानुसार उद्दिष्टाप्रमाणे वृक्ष लागवड करावी लागणार आहे. अद्यापपर्यंत कुठेही खड्डे खोदले नाही. त्यामुळे रोपे केव्हा लावणार हा सवाल आहे. गेल्या १० वर्षात केवळ ३.२५



टक्के वृक्ष आच्छादन वाढले, ही बाब अत्यंत गंभीर आहे.

### असे आहे विभागनिहाय वृक्षलागवडीचे टार्गेट

१० कोटी वृक्ष लागवड अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या २५ विभागाला वृक्ष लागवड करावी लागणार आहे. यात रेशीम विभाग ४ कोटी, वन विभाग २ कोटी, ग्राम विकास १ कोटी, नगर विकास १ कोटी, शालेय शिक्षण २० लाख, सार्वजनिक बांधकाम १५ लाख, जलसंपदा ५ लाख, महसूल ५ लाख, उद्योग विभाग ५ लाख, गृह विभाग ५ लाख, उच्च व तंत्र शिक्षण ५ लाख, मृद व जलसंधारण ५ लाख, सहकार व पणन ५ लाख, आरोग्य विभाग ३ लाख, ऊर्जा विभाग ३ लाख, आदिवासी विकास ३ लाख, पशुसंवर्धन व दुग्ध विकास २ लाख, महिला व बालकल्याण २ लाख, वैद्यकीय शिक्षण २ लाख, पर्यटन विकास २ लाख, राज्य रस्ते विकास महामंडळ २० लाख, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण २० लाख, रेल्वे २० लाख, संरक्षण विभाग ५० लाख यासह 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत ५० लाख अशी एकूण १० कोटी वृक्ष लागवड केली जाणार आहे.

# धारणीत बार व देशी दारू दुकानात ८ लाखाची चोरी : छतावरची रूम तोडून दारू दुकानात घुसले चोर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ धारणी**

धारणी बसस्थानक परिसरातील प्रसिद्ध रामदास जैस्वाल यांच्या मालकीचे मुख्य महामार्गावरील बार व देशी दारू दुकानात शनिवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी सुमारे ८ लाख रुपयांची चोरी केल्याची घटना समोर आली आहे. दुकानात त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी लागत असलेल्या शैक्षणिक फी ची रक्कम ठेवली असल्याची माहिती त्यांनी दिली

धारणी शहरात ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.चोरीसाठी चोरट्यांनी दुकानाच्या छतावरून आत प्रवेश केला. नंतर दुकानातील सर्व माल व्यवस्थितपणे उचलून नेण्यात आला. चोरीचा प्रकार तब्बल ८ लाख रुपयांचा असल्याचे व्यवस्थापकाचे म्हणणे आहे. ही घटना पहाटे ३:३० ते ४:०० च्या सुमारास घडल्याचे सांगण्यात येत आहे.घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आरोपींचा चेहरा स्पष्टपणे दिसून आला आहे. पोलिस त्याच आधारावर आरोपींचा शोध घेत आहेत. परिसरातील काही फुटेजही तपासले जात आहेत.जैस्वाल बार आणि देशी दारू दुकान परिसरात यापूर्वीही चोरीच्या घटना घडल्या असून, या घटनेमुळे पुन्हा एकदा सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून, लवकरच आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

# बुलढाणा मध्ये केस गळती, नखे गळतीनंतर आता हाताला भेगांचा आजार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६बुलढाणा**

बातमीचे शीर्षक वाचून लाखो बुलढाणा जिल्हावासी दचकणे, भयभीत होणे स्वाभाविक आहे. याचे कारण चालू वर्षांत जिल्हावासियांनी अकस्मात केस गळती, टक्कल पडणे बोटांची नखे गळून पडणे असे गूढ आजार अनुभवले. खामगाव, शेगाव तालुक्यातील टक्कलचा आजार घाटावरील चिखली, मेहकर तालुक्यातही पसरला. याला महिने लोटले तरी अजूनही भारतीय वैद्यकीय संशोधन संस्थेचा अहवाल अजूनही लालफीतशाहीत अडकला आहे. यामुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा घायकुतीला आल्या आहे. या पार्श्वभूमीवर आता मेहकर तालुक्यात हाताला भेगा पडण्याच्या आजाराची चर्चा सुरु झाली आहे. मेहकर तालुक्यातील शेलगांव देशमुख येथील वीस गावाकऱ्यांना



हाताला भेगा पडल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे प्राप्त झाल्या.

केंद्रीय आरोग्य, आयुष राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांचा गृह मतदारसंघ असलेल्या गावातील हा प्रकार आहे. यामुळे आरोग्य यंत्रणानी भेगांची गंभीर दखल घेतली. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे एक पथक शेलगाव देशमुख मध्ये दाखल झाले. ह्या रुग्णांची तपासणी करण्याकरिता जिल्हा स्तरावरील जिल्हा साथरोग तथा सर्वेक्षण अधिकारी डॉ.प्रशांत तांगडे, वैद्यकीय अधिकारी तथा त्वचारोग तज्ज्ञ डॉ.बालाजी आद्रट उपस्थित होते. स्थानिक वैद्यकीय अधिकारी डॉ. माधुरी मिश्रा, आरोग्यसेवक, आरोग्य सेविका तथा गावातील सगळ्या आशा सेविका व ईतर कर्मचारी वृंद यांनी सदर तपासणी केली.

पथकाने २० रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी जवळपास सगळ्या रुग्णांना इसबगोल (एकझेमा पालमोप्लांटर केरटोडेर्मा वा पालमोप्लांटर पसोरिअसिस) हा आजार असल्याचे दिसून आले. त्यांना हा आजार मागील १२ महिने ते ५ वर्षांपासून आहेत. मागील १-२ वर्षांपासून बुलढाणा व अकोला येथील त्वचारोग तज्ञांकडुन रुग्णावर उपचार सुरु असल्याचे निष्पन्न झाले.

# काहो साहेब ! तणनाशक धोकादायक, तर कीटकनाशक नाही का? शेतकऱ्यांना सरकारच्या बंदीचा बसतोय फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

राज्य सरकारने कापसाचे तणनाशक सहनशील बियाणे विक्री व वापर यावर महाराष्ट्रात बंदी घातली आहे. तणनाशक पर्यावरणाला हानीकारक आहे, असा दावा सरकारने केला आहे. या बियाण्यांची विक्री व वापर करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तुरुंगात पाठविले जाते. शेतकरी तणनाशकांचा वापर पिकातील तणाचे व्यवस्थापन करण्यासाठी करतात. याच्या वापरामुळे मोठी झाडे किंवा झुडपे नष्ट होत नाही.

उलट, कीटकनाशकांमुळे फुलपाखरे, मधमाश्यांसह इतर मित्रकिडीच नव्हे तर माणसेदेखील मरतात. मग तणनाशकांच्या तुलनेत कीटकनाशकांमुळे



पर्यावरण जैवविविधतेला धोका उद्भवत नाही का? पिकांची बियाण्याचा व तणनाशकाचा आपसात संबंध नाही. एचटीबीटी कापसाच्या बियाण्यांमध्ये बॅसिलस थुरिंगिएन्सिस जनुकासोबतच हर्बिसाइड टॉलरन्ट जनुके टाकलेली असतात. त्यामुळे एचटीबीटी कापसाच्या पिकात ग्लायफोसेट व इतर तणनाशकांची फवारणी केल्यास पीक सुरक्षित राहात असून, तण नष्ट होते. केंद्र सरकारने एचटीबीटी कापसाच्या बियाण्यांवर बंदी घातली असली तरी गुजरात व तेलंगणामध्ये या बियाण्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते. मजुरांच्या कमतरतेमुळे शेतकरी या बियाण्याला प्राधान्य देतात. एचटीबीटी कापूस वगळता बीटी कापूस, सोयाबीन, ज्वारी, मूग, उडीद, तूर या व इतर पिकांच्या बियाण्यांमध्ये हर्बिसाइड टॉलरन्ट जनुके टाकलेली नसतात. या पिकांमधील तणांचे व्यवस्थापन करण्यासाठी निवडक तणनाशके बाजारात उपलब्ध असून, शेतकरी त्यांचा नियमित वापर करतात. या बियाणे व तणनाशकांच्या उत्पादन व वापरावर केंद्र व राज्य सरकारने बंदी घातलेली नाही. यात वादग्रस्त ग्लायफोसेटचाही समावेश आहे.

### कॅन्सर होत असल्याचा दावा

तणनाशकांच्या वापरामुळे माणसांना कॅन्सर होत असल्याचा दावा पर्यावरणवादी, काही नेते व अधिकारी करतात. जगात ग्लायफोसेटचा वापर ७० वर्षांपासून केला जात आहे. तणनाशकांची सतत फवारणी करणाऱ्या सात कोटी लोकांपैकी एकास स्किन कॅन्सर होण्याची शक्यता निर्माण होते, असेही संशोधनातून स्पष्ट झाले आहे. जगात आजवर केवळ दोन व्यक्तींनी त्यांना तणनाशक फवारणीदरम्यान स्किन कॅन्सर झाल्याचा दावा करीत न्यायालयात दाद मागितली. ते दोघेही अमेरिकन आहेत. डब्ल्यूटीओने कॉफी आणि ग्लायफोसेटला एकाच कॅटेगरीत समाविष्ट केले आहे.

# ‘पॉलीटेक्निक’ प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीचे वेळापत्रक तंत्रशिक्षण संचालनालयाकडून जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

इन्सर्ट मध्ये ३६



शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ साठी तीन वर्षे कालावधीच्या पूर्णवेळ पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तूकला अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीचे वेळापत्रक तंत्रशिक्षण संचालनायाकडून जाहीर करण्यात आले आहे. याकरिता विद्यार्थ्यांना आगामी १६ जून २०२५ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करता येणार आहे. इयत्ता दहावीचा निकाल दिनांक १३ मे रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाल्यानंतर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून २० मे पासून http: poly25. Dtemaharashtra.Gov. in/या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. प्रवेश अर्ज




भरण्यासाठी येणाऱ्या अडचणींबाबत विद्यार्थ्यांना काही तक्रार असल्यास ती दूर करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडून ७६६९१००२५७ / १८००३१३२१६४ हा मदत क्रमांक सुरु करण्यात आला आहे. सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत त्यावर संपर्क साधता येईल. ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रति अपलोड करणे ही प्रक्रिया दिनांक २० मे ते १६ जून यादरम्यान पार पडणार आहे. तसेच कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज भरल्याची निश्चित्ती करणे ही प्रक्रिया दिनांक २० मे ते १६ जून यादरम्यान पार पडणार आहे.विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक २०२५-२०२६ मध्ये एक आठवड्याची वाढ होण्याची शक्यता आहे. सोमवार दिनांक १६ जून २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालक - डॉ. विनोद मोहितकर यांनी या बाबतच्या सूचना पार पडलेल्या बैठकीत दिल्या आहे .अमरावती स्थित शासकीय तंत्रनिकेतन येथे प्रवेश प्रक्रियेला घेऊन विद्यार्थी व पालकांनी प्रवेश प्रक्रिया अधिकारी- प्रा. हमीद शेख यांच्याशी ८०८७९२५४६८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनप्राचार्य डॉ. अतुल बोराडे यांनी केले आहे.


# विज कापल्याने महावितरणच्या अभियंत्याला पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न दोन मद्यपी पेट्रोलची कॅन घेऊन पोहचले कार्यालयातः दोन्ही आरोपींना तात्काळ अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

विजबिल थकीत असल्याने महावितरणच्या सहाय्यक अभियंत्याने दोन आरोपींच्या घराचा विज पुरवठा खंडीत केला. त्यामुळे आवेशात अतिशय मद्यधुंद अवस्थेत असलेले दोन्ही आरोपीं रविवार १५ जुन रोजी चक्क पेट्रोलने भरलेली कॅन घेऊन महावितरणच्या कार्यालयात शिरले आणि सहाय्यक अभियंत्याच्या अंगावर पेट्रोल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. जिव वाचविण्यासाठी अभियंता तेथून पळाल्याने आरोपींनी त्यांच्या टेबलाला आग लावल्याने टेबलावरील कागदपत्रे व संगणक जळून खाक झाले.

वलगाव येथील महावितरणच्या कार्यालयातही घटना घडली असून याबाबत पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण महावितरण वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.वलगाव येथील महावितरणच्या तक्रारकर्त्याचे नाव गोपाल विनायक इंगळे (वय ३८)




आहे. तर अटकेतील आरोपींची नावे अविनाश गोवर्धन झाले.निर्मळ (वय ३३) व विनित दिलिपराव तायडे (वय ३३) दोन्ही रा. वलगाव अशी आहेत. माहितीनुसार, आरोपींच्या घराचे वीजबिल गेल्या अनेक महिन्यापासून बाकी होते. वलगाव महावितरणचे भरारी पथकाचे प्रमुख व वसूली मोहिम प्रमुख सहाय्यक अभियंता इंगळे यांनी अनेकवेळी दोन्ही आरोपींना विजबिल भरण्यासाठी तडजोड रक्कम आकारून दिली. परंतु, आरोपींनी मुदत संपल्यानंतरही तडतोड रक्कम न भरली नाही. त्यामुळे महावितरणने आरोपींच्या घराचा विज पुरवठा पोलवरून खंडीत केला. जेव्हा महावितरणच्या पथकाने ही कारवाई केली, तेव्हाच आरोपींनी प्रचंड राडा केला होता. तरी देखील महावितरणच्या पथकाने विज पुरवठा खंडीत करण्याची कारवाई पूर्ण केली. त्यामुळे दोन्ही आरोपी प्रचंड चिडलेले होते.रविवारी दुपारी दोन्ही आरोपी अतिशय मद्यधुंद अवस्थेत हातात पेट्रोलने भरलेली कॅन घेऊन वलगाव महातिवरणच्या कार्यालयात दाखल आरोपींनी प्रचंडधुमाकूळ घालत थेट सहाय्यक अभियंत्याच्या अंगावर व टेबलावर पेट्रोल ओतले. लगेच अभियंता तेथून पळून गेले. अभियंता पळून गेल्याने आरोपींनी त्यांच्या टेबलाला आग लावली. आगीत टेबलावरील संगणक, महत्त्वाची कागदपत्रे व फाईल्स पूर्णतः जळून खाक झाल्या. घटनेची माहिती मिळताच वलगाव पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वलगाव पोलिसांनी दोन्ही आरोपींची शोधमोहिम राबवून त्यांना अटक केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींची इर्विनमध्ये वैद्यकीय तपासणी करण्यात आली.